# आजचा सुधारक

विवेकवादी चिंतनाला वाहिलेले मराठी मासिक

वर्ष 25 अंक 12 मार्च 2015

हृया अंकात


| | | |
|---|---|---|
| २ | जुन्या चाकोरीत फसलेली मनोवृत्ती | *गीता साने* |
| ३ | नाही मानियले बहुमता | *नंदा खरे* |
| ७ | आजचा महाराष्ट्र आणि वैचारिकता | *अरूण टिकेकर* |
| १० | वैकल्पिक माध्यमांसमोरील आह्वाने | *अनुराधा मोहनी* |
| १४ | कलाकृती आणि समाज | *डॉ. राजीव जोशी* |
| १५ | कुठे नेऊन ठेवला विवेक तुमचा? | *मिलिंद सोनटक्के* |
| १७ | माझी विचारसरणी | *प्रा. य. ना. वालावलकर* |
| २० | शैक्षणिक गुणवत्ता मानसिकतेत रुजायला हवी ! | *सुरेन्द्र दिघे* |
| २२ | भारतातील रॅशनॅलिस्ट चळवळ | *प्रभाकर नानावटी* |
| २५ | जगावेगळे | *प्रभा गणोरकर* |


संस्थापक – संपादक

**दि. य. देशपांडे**

(1918-2006)

कार्यकारी संपादक

**प्रभाकर नानावटी**

**संपर्कः**

प्रभाकर नानावटी pkn.ans@gmail.com 9503334895

भरत मोहनी bharat_i@yahoo.com 9822736808

aajacha.sudharak@gmail.com

# जुन्या चाकोरीत फसलेली मनोवृत्ती

ज्या विज्ञानाने मानवी जीवन आमूलाग्र बदलले, भारत–चीन यांसारख्या प्राचीन व आपल्या चाकोरीत शतकानुशतके चालत असलेल्या संस्कृतींना त्या चाकोरीतून काढून, एका अनोळखी व बिकट मार्गाला लावले, त्या विज्ञानाच्या अभ्यासाला सध्या सर्व शिक्षण–संस्थांत अतोनात महत्त्व आलेले आहे. या शाखांना प्रवेश मिळवण्यासाठी विद्यार्थी कठोर परिश्रम करतात. मुलांनी (व मुलींनीसुद्धा) विज्ञानशाखेला जावे ही पालकांचीही महत्त्वाकांक्षा असते. विज्ञानाच्या लोकप्रियतेचे कारण मात्र निसर्गनियमांबद्दल मूलभूत जिज्ञासेपेक्षा, या अभ्यासक्रमातून पुढे तांत्रिक शिक्षणाच्या संस्थांची दारे उघडतात आणि डॉक्टर व इंजिनियर यांसारख्या पदव्या मिळाल्याने तरुण व तरुणी प्रतिष्ठेच्या नोकऱ्या मिळवू शकतात, हे असते. विज्ञानाच्या अभ्यासाचा हा हेतू संकुचित असल्याने विज्ञान हा अभ्यासक्रमामधला महत्त्वाचा पण अर्थशून्य विषय होतो. विज्ञानाची बुद्धिनिष्ठा विद्यार्थ्यांना सापडत नाही, व ते ती शोधीतही नाहीत.

विज्ञानाला अंधश्रद्धेचे वावडे आहे. त्याची ओळख तर्कशुद्ध विचाराने पटते. विज्ञान प्रत्येक गोष्टीबद्दल प्रमाण मागते ग्रंथाने वा गुरूने निर्वाळा दिला तरी तो बिनचूक असल्याचा पडताळा प्रत्यक्ष प्रयोगाने घ्यावा असा विज्ञानाचा दंडक आहे. हे पथ्य न पाळताच विज्ञानाचा अभ्यास करून केवळ गुण मिळवले, चांगली नोकरी मिळवली, तरी विज्ञान हे जीवनाची शैली किंवा जीवनाचे तत्त्वज्ञान होत नाही. ती जीवनावर धरलेली पातळ साय मात्र असते. त्यामुळे निकाल चांगला लागला किंवा चांगली नोकरी मिळाली म्हणजे सत्यनारायणाच्या पूजा केल्या जातात. लग्नासाठी पत्रिका पाहाव्या लागतात. पुढे आयुष्यात अडचणी आल्यास त्यांचे निराकरण करण्यासाठी जुन्या तंत्रमंत्रांची कास धरली जाते. एकंदरीत, विज्ञानात प्रावीण्य मिळवणाऱ्यांच्या मनोवृत्तीही जुन्याच चाकोरीत फसलेल्या असतात.

*गीता साने*

(भारतीय स्त्रीजीवन, १९८६)

## आदरांजली

## कॉम्रेड गोविंद पानसरे (१९३३–२०१५) यांचे दु:खद निधन

कोल्हापुरातील सागर माळ भागात ता. १६ फेब्रुवारी २०१५ रोजी सकाळच्या नऊच्या सुमारास बाइकवरून आलेले दोन अज्ञात हल्लेखोर कॉ. गाोविंद पानसरे यांच्यावर पाच गोळ्या झाडून पसार झाले. त्यामुळे कॉ. पानसरे गंभीररित्या जखमी झाले. त्यांच्या राहत्या घरापासून २०० मीटरवर ते व त्यांची पत्नी उमा पानसरे मॉर्निंग वॉक घेऊन परतत असताना या दोघांवरही हा हल्ला झाला. या हल्ल्यात त्यांची पत्नीसुद्धा जखमी झाली आहे. गेली पाच दिवस मृत्युशी कडवा संघर्ष करीत २० फेब्रुवरी २०१५ रोजी रात्रीपावणे अकरा वाजता मुंबईतील ब्रीच कॅण्डी रुग्णालयात त्यांचे निधन झाले. गोळी लागल्यामुळे त्यांची फुफ्फुसे निकामी झाली होती. रात्री उशिरा त्यातून रक्तस्राव झाल्याने त्यांचे निधन झाले. त्यांच्या मृत्यूने महाराष्ट्राने कुशल संघटक, अनुभवसिद्ध लेखक पुरोगामी विचारवंत आणि सामाजिक अन्यायाविरूद्ध लढणारा एक कार्यकर्ता गमावला. मारेकऱ्यांनी झाडलेल्या गोळ्यांनी त्यांचा बळी घेतला. त्यांच्या मृत्यूने संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे.

कॉ. गोविंद पानसरे हे नाव महाराष्ट्राला अपरिचित नाही. शेकडो लढे आणि सामाजिक चळवळींच्या माध्यमातून पायाला भिंगरी बांधून पानसरे महाराष्ट्राच्या घराघरात पोहचले. कॉ. पानसरे यांनी आपल्या प्रखर बुद्धीमत्तेने, उत्तुंग ध्येयवादाने, प्रामाणिक तत्वज्ञानाने आणि कडव्या संघर्षाच्या जोरावर सार्वजनिक जीवनात आपले अढळस्थान निर्माण केले. कम्युनिस्ट पक्षाचा एक लढवय्या कार्यकर्ता म्हणून पानसरे गेली ६० वर्ष देशाच्या सार्वजनिक जीवनात वावरत होते. या काळात त्यांनी असंख्य आंदोलने केली. संघर्ष केले, तुरुंगवास भोगला, पोलीसांच्या लाठ्या झेलल्या पण अनेक डाव्या तरुणांचे ऊर्जाकेंद्र असलेला हा नेता कधी डगमगला नाही. विशेषत: सामाजिक अन्याय आणि अंधश्रद्धा यांनी जिथे जिथे डोके वर काढण्याचा प्रयत्न केला तिथे तिथे संघर्षाने पेटून उठून या प्रकारांना जमिनीत गाडण्यात ते अग्रेसर राहिले. उत्तम वक्ते, कुशल संघटक, लढाऊ नेते, अनुभवसिद्ध लेखक, संशोधक आणि अनेकांचे आधारस्तंभ अशी अनेक बिरूदे आज कॉ. पानसरे यांच्या नावाला अलगदपणे चिकटली आहेत.

त्यांच्या कुटुंबियांवर कोसळलेल्या या दु:खात आम्ही सर्व सहभागी आहोत.

# नाही मानियले बहुमता

*नंदा खरे*

खाजाउ माध्यम सामाजिक समस्या राजकारण

''या प्रकारच्या मासिकाला वर्गणीदार मिळतात तरी किती?'' हा बहुधा 'आजचा सुधारक'बद्दल सर्वांत जास्त वेळा विचारला जाणारा प्रश्न असावा. आपल्या आजवरच्या पंचवीस वर्षांत 'आसु'ने एखाददोन वर्षे नऊशेचा आकडा ओलांडलाही, पण प्रातिनिधिक वर्गणीदारसंख्या मात्र सातशे ते आठशेच मानायला हवी. याशिवाय चाळीसेक अंक वृत्तपत्रे व समविचारी नियतकालिकांना पाठवले जातात, पंचवीसतीस अंक संपादकांमध्ये वाटले जातात आणि सत्तरेक ज्यादा प्रती बांधीव खंडांसाठी छापल्या जातात. म्हणजे 'प्रिंट ऑर्डर'चा प्रातिनिधिक आकार आठशे अधिकउणे पन्नास असा असतो.

बहुतेक वेळा साताठशे हा आकडा ऐकल्यावरची प्रतिक्रिया डोळ्यांत तुच्छता, आणि एखादा अस्पष्ट हुंकार, अशी असायची. अपवादानेच कोणी, ''अरे व्वा! वैचारिक मराठी मासिकाला आठेकशे वर्गणीदार! यू हॅव अराईव्हड!'' असे मनापासून म्हणून जाई!

मासिक कसे असावे यावर संस्थापक संपादक दि.य.देशपांडे यांनी एप्रिल १९९८ मध्ये लिहिलेल्या काही सूचना नोंदतो. ह्या सूचना त्यांनी संपादकपद सोडताना केलेल्या आहेत. (अंक ९.१, पाने ३-४)

*मासिकाचे स्वरूप व धोरण गेली आठ वर्ष राहिले तेच राहावे. उदा.त्यात जाहिराती घेऊ नयेत. देणग्या मिळविण्याचे प्रयत्न करू नयेत. विशेषतः ज्यामुळे आपल्याला किंचितही मिंधेपणा येईल अशा देणग्या अनाहूत आल्या तरी स्वीकारू नयेत.*

*मासिकाचे गेल्या आठ वर्षांत एक विशिष्ट रूप बनले आहे. त्याला एक व्यक्तिमत्त्व प्राप्त झाले असून त्याला एक दर्जा आहे. या दोन्ही गोष्टी कायम राहाव्यात. मासिकाला वर्गणीदार फार नाहीत हे खरे आहे. पण केवळ वर्गणीदार वाढावेत म्हणून त्याचा दर्जा खाली आणू नये. तसेच ते रंजक करण्यकरिताही त्यात फारसा बदल करू नये.*

*मासिकाचे स्वरूप विवेकवादी आहे. केवळ विवेकवादाला वाहिलेले दुसरे मासिक महाराष्ट्रात नाही असे मला वाटते. ते त्याचे वैशिष्ट्ये टिकवून ठेवावे. त्याचा कटाक्ष श्रद्धेचा उच्छेद, विचार आणि जीवन यात विवेकावर भर देणे, जीवनाच्या विविध क्षेत्रांत समंजसपणा, विवेकीपणा अंगी बाणेल असे प्रयत्न यावर असावा. लोक पूर्ण इहवादी होतील अशी आशा करणे भाबडेपणाचे होईल. पण तरीही विवेकवाद जितका वाढेल तितका वाढविण्याचा प्रयत्न करावा.*

*मासिकाचे धोरण व्यक्तिस्वातंत्र्यवादी आणि समतावादी राहिले आहे. सर्व मानव समान आहेत, त्यात स्त्रियांचाही समावेश आहे. तसेच त्याचा विज्ञानावर भर असावा. वैज्ञानिक दृष्टी अंगी बाणेल असा प्रयत्न करावा. विज्ञानाच्या विकृतीपासून सावध राहावे.*

*आपले मासिक सामान्य नाही. ते एका हेतूने, एका ध्येयाने प्रेरित झालेले आहे. ते तसेच राहावे, त्यामुळे ते केवळ विद्वानांकरिताच, किंवा विवेकवाद्यांकरिताच आहे अशी टीका कोणी केली तरी हरकत नाही. विद्वानांकरिताही मासिक चालवणे महत्त्वाचे आहे.*

*राजकीय विषय आपल्याला वर्ज्य नाहीत. पण सर्व राजकीय घडामोडींचा समाचार आपण घेतला पाहिजे असे नाही. ज्याने बुद्धी सुसंस्कृत होईल असे काहीही वर्ज्य नाही.*

यांतील प्रत्येक सूचना पुढील संपादकांनाही पटलेली आहे, व ती पाळायचे प्रयत्नही केले गेले आहेत. कधीकधी अगदी मूलभूत पातळीवर संपादकांनाही प्रश्न पडत. स्वतःच्या भूमिकांबद्दल शंका वाटत. याचे सुंदर आणि विवेकी उदाहरण प्र.ब.कुळकर्णी यांच्या जानेवारी २००८ च्या संपादकीयात भेटते. खरे तर ते पूर्णच संपादकीय वाचनीय आहे, पण लांबण लावल्याचा आरोप टाळायला काही उतारेच फक्त देतो. (आ.सु. १८.१०, पृ. ४३५-४३८)

1. *कधी कधी तुम्ही समजता तो विवेकवादच नाही असे उद्गारही कोणी काढतात. ''तुमच्या विवेकवादात भलेही ते बसत असेल. हा ज्याच्या त्याच्या आकलनाचा भाग आहे.'' म्हणूनही मतभेदांची वाट लावली जाते. ज्याला ग्यानबाचा विवेकवाद म्हणता येईल तो काय असेल बरे?*

*विवेकवाद ही नैतिक आचरणामागची विचारसरणी आहे, हे उघड आहे. आपण विवेकाने वागावे हे म्हणणे विवेकवाद आहे. विवेक म्हणजे भेद करण्याची शक्ती. सार-असार, सत्य-असत्य, सद्-असद् विवेक - करून वागले पाहिजे. म्हणजे जे रूढीने आले तेच भले असे मानू नये. परंपरेची चिकित्सा करावी.'बाबावाक्यं प्रमाणम्' असे करू नये. धर्म-शास्त्र म्हणून जे चालत आले त्याचीही शहानिशा करावी. बुद्धी वापरावी. आंधळेपणाने, आपली वडिलोपार्जित विहीर आहे म्हणून खारट असले तरी तिचेच पाणी प्यावे - असे बिनडोकपणे ठरवू नये.*

२. *लग्नकार्य ही घरगुती बाब आहे. ज्याची त्याने ती साधेपणाने पार पाडावी असे मत असणारा सुधारक ज्या लग्नात थाट-माट, उधळपट्टी आहे तेथे हजेरी लावतो. ती त्याने लावावी की नाही? सामाजिक शिष्टाचार म्हणून सामील व्हावे की बहिष्कार करावा? स्वतःच्या मुलाबाळांच्या लग्नकार्यात शेकडो हजारो आमंत्रितांच्या मेजवान्या उठवाव्यात हे विवेकात बसते का? सुधारकी साधेपणाच्या पुरस्कारात बसते का? 'नाही' हे सत्वर उत्तर उग्र विवेकवादी देईल. अनुग्र म्हणेल - ह्या सुधारकाचा उद्योग-व्यवसाय असा आहे. की त्याचा हजारो लहानमोठ्यांशी नित्यसंबंध येतो. त्यांच्या कार्यप्रसंगात ह्याला जावे लागते. त्यामुळे आपल्या घरच्या कार्यात त्याला इतरांना बोलवावेच लागते.म्हणून त्याचे वागणे क्षम्य समजावे. कारण त्याची वृत्ती पूर्णपणे विवेकवादी आहे.*

३. *निष्कर्ष हा की विवेकवाद हा एक मार्ग आहे. त्यावर वाटचाल करून काही पुष्कळ पुढे गेलेले असतील. काही चार पावले चालले असतील. मनोमन पटलेले तसेच जीवनात आणण्याचा, आचरण्याचा प्रयत्नही त्या त्या प्रमाणात प्रशंसनीय म्हणावा लागेल.*

*'आपण विवेकाच्या वाटेवर एकतरी पाऊल टाकले आहे का?' हा खरा प्रश्न आहे.*

या संपादकीयात प्र.ब. कुळकर्णी उग्र विवेकवादी व अनुग्र विवेकवादी असा एक महत्त्वाचा भेद करतात. तो आणिकही पातळ्या पिंजून विस्तृत केला जाऊ शकतो. एखादी व्यक्ती निरीश्वरवादाबाबत उग्र आणि त्याचवेळी स्त्री-पुरुष समतेबाबत अनुग्र असू शकते. एखादी व्यक्ती जात्यंताबाबत उग्र आणि त्याचवेळी अर्थव्यवस्थेवर समाजाचे नियंत्रण असणे-नसणे याबाबत अनुग्र असू शकते. अखेर माझा निष्कर्ष असा निघतो, की विवेकवाद एकोत्तरी नाही. त्यात विविध छटांची मते सामावून घेता येतात, असा तो बहुआयामी रंगपट आहे.

आणि बहुतेक जण आपला भूमिकांचा संचच कसा नेमका विवेकी आणि विवेकवादी आहे ते ठसवू पाहत असतात. त्यामुळे उग्रमताचे लोक अनुग्रांवर बोटचेपेपणाचा आरोप करत असतात, आणि उलट दिशेने अनुग्र ते उग्रमतवाद्यांवर सनातनीपणाचा आरोप करत असतात. 'आजचा सुधारक'चा वाचकवर्ग बहुशः विवेकी आणि विवेकवादीच होता/आहे. त्यामुळे त्यात उपजणारे आणि लढले जाणारे वादही बहुशः यादवी युद्धांसारखेच तीव्र असत! नागपूरकडे भावाभावांमधल्या भांडणांबद्दल म्हणतात, ''माही भीत (भिंत) पडली तरी चालंल, त्याआची मेंढी मेली पायजे!''. तर पूर्ण ताकदीनिशी घातले, खेळले, लढले जाणारे वाद, हा 'आसु'चा लक्षणगुण होत गेला.

मीही इतर संपादकांप्रमाणेच अशा वादांमध्ये चार दिले, चार घेतले आहेत. सध्याचे कार्यकारी संपादक प्रभाकर नानावटी यांना अशा वादांवरही एक लेख हवा होता, परंतु मला तो लिहवत नाही. वाद झडले तेव्हा अर्थाच ते दुखले होते; पण आज मात्र मनातल्या मनात मिष्किल हसूनच ते आठवले जातात. थोडक्यात काय, तर विवेकवादी जसे हसतात, रडतात, तसेच ते आपसात भांडतातही; आणि तेही विवेक व युक्तिवादाची सर्व उपकरणे व आयुधे वापरून!

आज मात्र विवेकवाद्यांमधली आपसातली घरगुती भांडणे, वाद, मतभेद; ही इतक्या सोज्वळ, सुस्वभावी तऱ्हेने स्वीकारावी अशी बाब उरलेली नाही.

गेल्या पंचवीस वर्षांत अविवेक सातत्याने समाजाचे जास्तजास्त भाग व्यापू लागलेला आहे. आपले 'विवेकवादी चिंतनाला वाहिलेले मासिक' परिणामशून्य ठरले आहे. पर्यायी पद्धतींची गरज सातत्याने आणि निकडीने जाणवते आहे. काही जुनेच मुद्दे पुन्हा नोंदतो.

## हा राष्ट्रवाद नव्हे!

सर्वंकष सत्तावादाचा, totalitarianism चा, कट्टर द्वेष्टा आणि विश्लेषक जॉर्ज ऑर्वेल याने ऑक्टोबर १९४५ मध्ये 'पॉलेमिक' या नियकालिकासाठी 'नोट्स ऑन नॅशनॅलिझम' नावाचा एक लेख लिहिला. त्याचे संक्षिप्त भाषांतर 'आसु'ने जुलै '०४ व ऑगस्ट '०४ च्या अंकांमध्ये प्रकाशित केले (अंक १५.४ व १५.५). त्यातील महत्त्वाचा अंश असा -

*मुळात दुसऱ्या महायुद्धानंतरच्या इंग्रज बुद्धिजीवी-विचारवंत वर्गाचे पूर्वग्रह दाखवणारा हा लेख जे 'गुणधर्म' नोंदतो, ते आजच्या भारतीय स्थितीत अनेकानेक वर्गांना लागू पडतात. ब्राह्मण्यवादी/मनुवादी, ब्राह्मणेतरवादी/दलितवादी, हिंदुत्ववादी, इस्लामवादी, विज्ञानवादी, अध्यात्मवादी, स्त्रीवादी, पितृसत्तावादी, स्थितिवादी, परिवर्तनवादी, गांधीवादी, लोहियावादी – सर्व, सर्व विचारधारांच्या पाईकांमध्ये 'नॅशनॅलिझम'चे दोष आढळतात.*

ही ऑर्वेलच्या लेखावर संपादकीय टिप्पणी आहे.

*नॅशनॅलिझमची देशभक्तीशी गल्लत करू नये. या दोन कल्पना इतक्या सैलपणे वापरल्या जातात की कोणतीही व्याख्या चुकीची ठरवता येते. पण या कल्पनांमध्ये फरक करायलाच हवा, कारण त्या कधीकधी एकमेकांविरुद्ध भावभावनांनाही जन्म देतात. एखादे भौगोलिक क्षेत्र किंवा एखादी जीवनपद्धती सर्वोत्कृष्ट आहे असे मानूनही इतरांना त्या क्षेत्राखाली आणण्याची किंवा इतरांवर ती जीवनपद्धती लादण्याची इच्छा नसणे, ही झाली देशभक्ती. सांस्कृतिक किंवा सैनिकी दृष्टीने ही बचावात्मक भावना आहे. नॅशनॅलिझमला मात्र सत्तेच्या आकांक्षेपासून वेगळे काढता येत नाही. प्रत्येक नॅशनॅलिस्ट आपल्या निष्ठास्थळाशी समर्पित भावाने जोडलेला असतो. त्या निष्ठास्थळाचे महत्त्व वाढवणे आणि प्रसार करणे यातच त्याच्या जीवनाचा हेतू असतो.*

*जेव्हा हा शब्द जर्मनी-जपानसारख्या देशांतील बदनाम चळवळींना लावला जातो तेव्हा हे सारे उघड असते. नाझीवादासारख्या प्रकाराबद्दल आपण 'बाहेरचे' लोक साधारणपणे सारख्याच गोष्टी पाहून एकसारखीच मते घडवतो. पण मी नॅशनॅलिझम हा शब्द एका वेगळ्या, विस्तारित अर्थाने वापरतो. त्यात कम्यूनिझम, राजकीय कॅथलिसिझम, झिअनिझम (ज्यू-वाद), अँटिसेमिटिझम (ज्यू-द्वेष), ट्रॉट्स्कीइझम, युद्धविरोधवाद, हे सारेच बसते. त्यात एखाद्या सरकाराला किंवा देशाला – विशेषतः स्वतःच्या देशाला – निष्ठा वाहिल्या जात नाहीत. कधीकधी तर ज्याला निष्ठा वाहिली जाते तो घटकच अस्तित्वात नसतो – जसे, ज्यूअरी, इस्लाम, ख्रिश्चनडम, प्रोलेटारियट (कामगारवर्ग), श्वेत वंश, या कल्पना पहा. त्या तीव्र भावना जागवतात, पण मुळात तसे काही आहे यावरच गंभीर प्रश्नचिन्हे आहेत. त्यांच्या सर्वमान्य व्याख्याही नाहीत.*

*हेही जाणायला हवे की नॅशनॅलिझम ही वृत्ती फक्त कशाच्या तरी विरोधातही असू शकते. जसे, ट्रॉट्स्कीवादी कशाच्याही पक्षाचे नसून फक्त सोव्हिएत रशियाविरोधी असतात. नॅशनॅलिझमचा माझा वापर समजायला हे अंग समजून घेणे आवश्यक आहे. नॅशनॅलिस्ट फक्त स्पर्धात्मक विचार करतात, कशाचा तरी किंवा कशाच्या विरोधाचा तरी. आपल्या निष्ठास्थळाच्या स्तुतीसाठी किंवा आपल्या द्वेषस्थळाच्या हानीसाठी ते आपली मानसिक क्षमता वापरतात. त्यांचे विचार नेहमी जय, पराजय, मान, मानहानी यांभोवतीच फिरतात. त्यांना इतिहास, विशेषतः समकालीन इतिहास, वेगवेगळ्या शक्तिस्रोतांच्या चढउतारांमधूनच दिसतो. जगातली प्रत्येक घटना आपल्या निष्ठास्थळ/द्वेषस्थळाला पूरक-मारक रूपातच दिसते.*

तर या नमुन्याची नॅशनॅलिझम जगभर वाढत आहे, आणि भारतात तर ती सरासरीच्या जास्त वेगाने वाढत आहे, नुकताच इंडियन सायन्स काँग्रेसमध्ये झालेला खऱ्याखोट्या स्मरणरमणाचा तमाशा याचे उत्तम उदाहरण आहे. प्रत्येक पुनरुज्जीवनवादी नॅशनॅलिझम आपल्या 'उज्ज्वल भूतकाळा'वर गुलाबी किरण फेकतच सुरू होतो. नंतर मात्र झपाट्याने ती ऑर्वेलच्या शब्दांत, ''त्यांचे विचार नेहमी जय, पराजय, मान, मानहानी यांभोवतीच फिरत राहतात.'' या पातळीला पोचते.

यातून उपजतात 'ॲलर्जीज' (allergies). मुळात फारशा धोकादायक नसलेल्या खऱ्याखोट्या अतिक्रमणांवर शरीराची प्रतिरक्षाव्यवस्था (immune system) तुटून पडणे म्हणजे ॲलर्जी कार्यान्वित होणे. तर सगोत्री व आंतरजातीय विवाहांविरुद्ध फतवे काढणाऱ्या जातपंचायती व खापपंचायती, लव्ह जिहाद प्रकरण, ही सारी ॲलर्जीची उदाहरणे आहेत.

यांतूनच उपजतो रक्ताचा कॅन्सर, ऊर्फ ल्यूकेमिया (leukemia), ज्या रोगात अपक्व पांढऱ्या रोगनिवारक पेशींचे बेसुमार उत्पादन होऊन शरीरातले रक्ताचे चलनवलनच बंद पडते. कोठल्यातरी काही शतके जुन्या काल्पनिक अपमानाचा सूड घेण्याचे बाबरी मशीद प्रकरण, हे माझ्या मते असे उदाहरण आहे. अपक्व, अशिक्षित करसेवकांनी आपल्या वृत्तीने समाजशरीरात प्राणवायू खेळवण्याचे समाजरक्ताचे व्यवहारच त्या घटनेने धोक्यात आणले.

अशा ॲलर्जीज व रक्त-कर्करोग कार्यान्वित करणे हा संधिसाधू तुच्छतावाद आहे. हा राष्ट्रवाद नव्हे!

**मूल्यऱ्हास**

आजच्या (२५ जाने.२०१५) वृत्तपत्रांमध्ये एक बातमी आहे, ''राज्यात नऊ नवी शहरे व सहा नवे विमानतळ उभारणार!'' सध्या भारतात विकासपर्व सुरू आहे. सकल राष्ट्रीय उत्पाद (GDP) झपाट्याने वाढणार आहे. 'मेक इन इंडिया' योजनेमुळे प्रचंड प्रमाणात थेट परकी गुंतवणूक (FDI) आकर्षित करण्यात भारताला चीनपेक्षा जास्त यश मिळणार आहे. नव्या पर्यावरण धोरणांमुळे पर्यावरणवादी विकासात खीळ घालू शकणार नाहीत. नव्या भूसंपादन कायद्यांमुळे शेतकरी उद्योगांना जमीन देण्यात खोडे घालू शकणार नाहीत. नव्या औद्योगिक श्रमविवाद कायद्यांमुळे बेताल यूनियनबाजीला लगाम घातला जाईल. इत्यादी, इत्यादी.

GDP वाढायला हवा, त्यासाठी तात्पुरती तरी FDI ची गरज पडेल, हे कोणीच नाकारू शकत नाही. पण सोबतच धनदांडग्या, हावरट उद्योजकांना पर्यावरण-विध्वंसापासून दूर ठेवणे, शेतकऱ्यांची जमीन जोर-जबरीने कोणालाही घेऊ न देणे, कामगारांचे हक्क सुरक्षित ठेवणे, ह्यांची आवश्यकताही कोणी नाकारू शकत नाही. आणि या व्यवहारांमध्ये सरकारची भूमिका ठामपणे दुर्बलांच्या पक्षाकडूनच असायला हवी.

जेम्स मिल् आपल्या 'ऑन गव्हर्नमेंट' या निबंधात म्हणतो, ''माणसांचा आपल्या आकांक्षापूर्तीसाठी दुसऱ्याचे हिरावून घेण्याकडे कल असतो. यामुळे काही थोडे लोक व त्यांचे प्रतिनिधी वगळता सर्वांची लूट केली जाणे अपरिहार्य क्रमाने घडते. ज्यांचे हिरावून घेतले जाते त्यांना जेमतेम जगणे शक्य होईल अशा स्थितीत लोटले जाते, येवढेच नव्हे तर त्यांना तीव्रतम भीतीला सामोरे जावे लागेल असे क्रौर्य दाखवले जाते. हे माणसांच्या स्वभावातले तत्त्व हा राज्यशासनाच्या आवश्यकतेचा पाया आहे.''

आणि आज प्रचलित केले जात असेलेले विकासाचे प्रतिमान राज्यशासनाची पायाभूत आवश्यक तत्त्वे न पाळता 'काही थोडे लोक व त्यांचे प्रतिनिधी' यांचीच धन करणारे आहे, असे माझे मत आहे. ही भूमिका स्पष्ट करणारे 'आसु'तील लेख संख्येने खूप आहेत; इतके, की त्यांचा केवळ उल्लेख करणेही इथे अशक्य आहे. आता ही भूमिका डावी, मार्क्सिस्ट आहे का? बहुधा हो. आजच्या सर्व प्रस्थापितेतर मतांना 'माक्सिस्ट' म्हणण्याच्या काळात तर नक्कीच हो!

पण या 'मार्क्सिझम'ला पर्याय आहे तो GDP-FDI वाढवण्याला केंद्रस्थान देण्याचा, ज्याने सर्व मानवतावादी आणि मानवी मूल्ये वाऱ्यावर सोडली जातात. आणि तसे करणे विवेकी वागण्यात बसवता येते, असे मला वाटत नाही.

परंतु आज केवळ GDP-FDI ना केंद्रस्थान देऊ नये, तर इतर मूल्यकल्पनांसोबतच, त्यांच्या मर्यादांतच या बाबी वाढवायचा प्रयत्न करावा, असे म्हणण्यावरही तीव्र प्रतिक्रिया उमटतात. ''मग काय तुम्हाला राहुल गांधी पंतप्रधान होऊन हवा आहे?'', किंवा ''मग मेधा पाटकरला पंतप्रधान करा, म्हणजे तुमच्या आत्म्याला शांती मिळेल!'', अशा ठार अविवेकी प्रतिक्रिया येतात.

थोडक्यात म्हणजे विकास, तोही GDP केंद्रित विकास, याला पर्याय शोधणेही आज अमान्य केले जात आहे. आणि अर्थातच नऊ नवी शहरे व सहा नवे विमानतळ ह्यांना विकास न मानणे, हा वेडेपणाच आहे!

सर्वाधिकांचे सर्वाधिक भले चाहणे, हा उपयोगितावाद. त्या धूसर हिशोबांत सर्व माणसांना सारखेच मानणेही आलेच. ''काय आहे?'' या प्रश्नासाठी विज्ञान वापरावे, आणि ''काय घडणे चांगले?'' हे तपासायला उपयोगितावाद वापरावा, ही दि.य.देशपांड्यांची भूमिका.

'माझ्या जीवनाचे तात्त्विक अधिष्ठान' या लेखात बाबासाहेब आंबेडकरांचे मत 'आसु'ने पुन्हा एकदा मांडले (अंक १८.७).

*माझ्या जीवनविषयक तत्त्वज्ञानात स्वातंत्र्याला स्थान आहे हे मला आग्रहपूर्वक सांगावयाचे आहे. पण त्याबरोबर अनिर्बंध स्वातंत्र्य समतेला मारक ठरते. माझ्या तत्त्वज्ञानात समतेचे स्थान स्वातंत्र्यापेक्षा वरचे आहे. तरीसुद्धा त्यात संपूर्ण समतेला मात्र मुळीच थारा नाही. कारण अमर्याद समता ही स्वातंत्र्याच्या अस्तित्वाआड येते आणि स्वातंत्र्याला वाव असणे तर आवश्यक आहे.*

*माझ्या तत्त्वज्ञानात स्वातंत्र्य व समतेच्या अतिक्रमणापासून संरक्षण मिळावे म्हणूनच फक्त कायदेकानूंचे स्थान गृहीत धरलेले आहे. पण कायद्याचे स्थान मी फारच गौण मानतो. कारण स्वातंत्र्य व समतेचा भंग (होण्या)बाबतीत कायदा खात्रीने समर्थ ठरेल असा मला विश्वास वाटत नाही. मी बंधुभावाला सर्वोच्च स्थान देऊ इच्छितो; कारण स्वातंत्र्य व समता नाकारली जाण्याप्रसंगी बंधुभाव हाच खराखुरा रक्षक ठरतो. सहभाव हे बंधुभावाचे दुसरे नाव आहे आणि बंधुभाव अथवा मानवता हे धर्माचे दुसरे नाव आहे. कायदा वा सहभावाचे मूल्यमापन करताना हा फरक जाणवतो याचे कारण कायदा हा धर्मातीत असल्यामुळे तो कोणीही मोडू शकतो; याउलट सहभाव अथवा धर्म हा पवित्र असल्यामुळे त्याला मान देणे हे प्रत्येकाचे कर्तव्य गणले जाते.*

आज वेगळेच तात्त्विक अधिष्ठान असणाऱ्यांचे बहुमत आहे. परंतु याने 'आजचा सुधारक'चे तात्त्विक अधिष्ठान डळमळीत होण्याचे कारणही नाही व तशी शक्यताही नाही.

गेल्या तीन अंकांमधून मला माझ्या अनुभवांतून, निरीक्षणांतून, वाचनातून जाणवलेले सत्य मांडले. तो होता तुकारामांच्या एका प्रसिद्ध वचनाचा पूर्वार्ध.

*सत्य असत्याला मन केले ग्वाही.*

आता या लेखातून उत्तरार्ध मांडतो आहे.

नाही मानियले बहुमता.

vidya_nand@hotmail.com

■■

# आजचा महाराष्ट्र आणि वैचारिकता

*अरुण टिकेकर*

इतिहास सामाजिक समस्या राजकारण

महाराष्ट्रात मराठी संतांनी समाजमनाची जी काही शतके मशागत केली, त्यामुळे शिवाजी महाराजांसारख्या युगकर्त्या अलौकिक राज्यकर्त्याला त्याच्या विचारांचा समजून स्वीकार करणारा समाज अनायासे मिळाला. म्हणजे शिवाजी महाराजांचा अवतार होईपर्यंत संतांनी आचार-विचार, स्वातंत्र्य, समता आणि विश्वबंधुत्व आदी गुणांचे पाठ तत्कालीन समाजाकडून गिरवून घेतले होते. व्यक्तिगत आणि सामाजिक संकटांच्या प्रसंगांतून निभावून नेण्यासाठी कसे वागावे, हे सांगणारे संत हे 'विचारवंत' या संज्ञेस पात्र होते. इंग्रजांच्या उदयानंतर समाजात सुरू झालेल्या विचारमंथनात ज्ञानोपासकांपासून समाजहितचिंतकांपर्यंत आणि वैचारिक क्रांती घडवून आणणाऱ्या विभूतींपासून क्रियाशील विचारवंतांपर्यंत कित्येक समाजधुरीणांनी अवघा महाराष्ट्र ढवळून काढला होता. यांत काळाच्या पुढचा विचार करणारे होते, काळाबरोबर धावणारे होते, तसेच पुरोगामित्वाच्या फाजील उत्साहाच्या भरात नव्या सामाजिक समस्या निर्माण करण्याचे अतिसाहस दाखविणाऱ्यांना लगाम लावणारेही होते. साहजिकच समाज प्रबोधनाच्या मार्गावर वाटचाल करू लागला होता. व्यक्तिगत तसेच सार्वजनिक चारित्र्य आणि सामाजिक सामीलकी यांचे नवे आणि नवी उंची गाठणारे आयाम ठरवू लागला होता. पण कुठेतरी माशी शिंकली आणि प्रगतिपथावर असलेला आपला समाज 'यू टर्न' घेऊन उलटी पावले टाकू लागला. सामाजिक सुधारणांच्या बाबतीत ज्या महाराष्ट्राचे नेतृत्व अख्ख्या देशाने मानले होते, तोच महाराष्ट्र सामाजिकदृष्ट्या प्रगती खुंटलेल्या अन्य राज्यांसारखा झाला. वैचारिकतेची आणि विवेकाची साथ सोडल्याने महाराष्ट्रात बरेच अनर्थ घडले. याची सर्वाधिक जबाबदारी स्वातंत्र्योत्तर काळातील विचारवंतांवर येते, यात शंका नाही.

अल्पकालिक राजकीय लाभासाठी पुढच्या कित्येक पिढ्यांच्या भवितव्याचे नुकसान करणारे मोठे राजकीय नेते, स्वार्थासाठी आणि संपत्तिसंचयासाठी राजकीय तशीच व्यक्तिगत निष्ठा बदलण्यास मागेपुढे न पाहणारे लहान नेते आणि 'विचारवंत' हे बिरुद दिमाखाने मिरवणारी, पण कोणत्याही प्रकारचे सामाजिक दायित्व न मानणारी साहित्य, कला आणि डॉक्टरी, वकिली पेशांतील मंडळी महाराष्ट्राला पुढे घेऊन जात आहेत की मागे, असा प्रश्न आज कोणाही सुबुद्धाला पडेल. समाज जसजसा सुशिक्षित होईल, तसतसा तो अधिक विचारी, अधिक विवेकी, विनयशील आणि सुसंस्कारित होईल, असा पूर्वीच्या समाजधुरीणांचा जो कयास होता तो महाराष्ट्राने खोटा पाडला आहे. महाराष्ट्रात जो पैसा येऊ लागला आहे, तो उन्मत्त आणि उर्मट प्रवृत्तीलाच खतपाणी घालू लागला आहे. आपला समाज उघडपणे असभ्य भाषा आणि हिंसा यांचे समर्थन करू लागला आहे. नागरिकशास्त्राचे साधे साधे पाठ विसरू लागला आहे. कायदा बंधनकारक वाटू लागल्याने तो मोडण्याकडे त्याची प्रवृत्ती होऊ लागली आहे. याचा अर्थ मराठी संतांनी मराठी समाजाच्या मनाची जी मशागत केली होती, ती पार धुपली गेली आहे. मराठी समाजसुधारकांनी महाराष्ट्रात सुधारणांची जी रोपटी लावली होती, ती आर्थिक मस्तीच्या प्रखर उन्हात जळून खाक झाली आहेत. एकेक करून जुन्या-जाणत्या समाजसुधारकांना समाजाने हरवले आहे. त्या प्रत्येकाचे नाव हरघडी घेत त्यांच्या विचारांना मात्र समाजाने पराभूत केले आहे. समाजसुधारक विचारवंतांच्या बोलण्यातील लाभांश तेवढा उचलावयाचा आणि शहाणपणाचे

बोल तेवढे टाळावयाचे, या सामाजिक सवयीतून झुंडशाही-प्रवृत्ती वाढू लागली आहे. जनसामान्यांच्या मनात राग, लोभ, मत्सर, हिंसा आदी रिपू विषाप्रमाणे कालवण्याचेच काम अनेकांनी जाणते-अजाणतेपणाने पूर्णत्वाला नेले आहे किंवा आरंभिले आहे, आणि अनुयायांना त्वरित लाभाच्या अपेक्षेने आंधळे केले आहे.

एखादा 'जाणता राजा' म्हणविला जाणारा मोठा नेता आपल्या अनुयायांच्या भ्रष्टाचाराचे समर्थन करतो, त्या अनुयायांच्या भ्रष्टाचाराकडे दुर्लक्ष करतो तसेच इतरांनीही दुर्लक्ष करावे अशी अपेक्षा करतो, तेव्हा पक्षीय राजकारणाने त्याला किती संवेदनशून्य केले आहे याचेच प्रत्यंतर येते. विवेकाचे भान सुटल्याचेच हे लक्षण. वास्तविक यासंबंधात समाजातील विचारवंतांनी आवाज उठवून जनसामान्यांचे प्रबोधन करणे गरजेचे होते, आणि आजही आहे. पण विचारवंतांचे पेव फुटलेल्या आजच्या महाराष्ट्रात विचारवंतांचा दराराच उरलेला नाही. विचारवंत हे राज्यकर्त्यांच्या तर खिजगणतीतही नाहीत. विचारवंतांनी आपण होऊन आपली ही गत करून ठेवली आहे. ते राज्यकर्त्यांच्या भजनी तरी लागले आहेत, अन्यथा भीरुतेचे बळी तरी ठरले आहेत.

राज्यकर्ते हे सत्ता टिकवण्यासाठी मतलबी व्यवहार करणार, हे उघड आहे. शासन प्रत्येक क्षेत्रातील व्यक्तींना प्रोत्साहन देण्याची नामी शक्कल लढवत भरमसाट पुरस्कार देऊन विचारक्षम व्यक्तींना अंकित करण्याचा प्रयत्न करत असते. असे प्रोत्साहन देण्याचे निमित्त असते; पण पुरस्कारासाठी अर्ज वा विनंतीपत्र अत्यावश्यक ठरविल्यामुळे त्यांच्या विचाराच्या नांग्या ठेचण्याचेच राज्यकर्त्यांच्या मनात असते, हे उघड दिसते. पण त्यामुळे सरकारदरबारचे याचक यापलीकडे साहित्यिक, कलावंत, क्रीडापटू यांना किंमत उरत नाही. डॉक्टर-वकील यांनी आपला समाजाचे नेतृत्व करण्याचा बाणा तर केव्हाच सोडून दिला आहे. मग तटस्थ समाजहितचिंतकांचा विरोधी आवाज दाबायला कितीसा वेळ लागणार? स्वार्थी राजकारणी, मतलबी नवश्रीमंत आणि हतबल जनता स्वतंत्र विचार करू शकत नाही. हे सारे फक्त विकारांच्या आहारी जाऊ शकतात. त्यांना वास्तविक तटस्थ, निर्मोही आणि निर्भीड विचारवंतांनी मार्ग दाखवायचा असतो. विचारवंतही तटस्थ राहिले नाहीत, तेही मोहात गुरफटले तर समाजाला कोण तारणार?

आज अवघ्या महाराष्ट्राला वैचारिकतेचे वावडे निर्माण झाले आहे आणि नीतिमत्ता, चारित्र्य, सदसद्विवेक यांचा छुपा किंवा क्वचित कोठे उघड तिरस्कार वाटू लागला आहे, याचे मूळ विचारक्षम आणि विचारवंत यांच्याकडे पाहण्याच्या समाजाच्या आणि राज्यकर्त्यांच्या बदललेल्या दृष्टिकोणात आहे. समाजातील विचारवंतांचा उपमर्द करण्याची आवश्यकता नसते, हे प्रगल्भ राज्यकर्तेच जाणू शकतात. असे होणे हा संतांचा जसा पराभव आहे, तसाच तो प्रबोधन-पर्वातील विचारवंतांचा पराभव आहे. परत माघारीची पावले चालू लागलेला महाराष्ट्र पुन्हा १८१८ कडे वाटचाल करत आहे की काय, असे वाटण्याजोगी भयावह परिस्थिती आहे. पण तसे मानायला राज्यकर्त्यांपासून तथाकथित विचारक्षम व्यक्तींपर्यंत कोणीही तयार नाहीत. ढोंगाचा आधार घेतला की सारे कसे छान छान दिसायला लागते.

गेल्या साठेक वर्षांत आपल्या समाजात 'समते'च्या – म्हणजे उपेक्षितांना सामाजिक न्याय मिळवून द्यायच्या एकमेव विचाराव्यतिरिक्त इतर सामाजिक प्रगतीचा वा अभिसरणाचा कोणताही नवा विचार पुढे गेलेला नाही. मग तो संस्कृतिविचार असो वा धर्मविचार! दलित साहित्यविचाराचा अपवाद वगळता नवा साहित्यविचार वा आधुनिक कलाविचार विकसित झालेला नाही, हे कटू सत्यही स्वीकारावे लागते. सामाजिक न्यायाचा विचार प्राधान्यक्रमाने होणे हे अत्यावश्यकच होते आणि आजही आहे. उपेक्षितांवर अन्याय होत असताना कोणत्याही प्रकारच्या अन्य प्रगतीचा विचारही अयोग्य ठरला असता. पण 'सामाजिक न्याय' ही बदलती संकल्पना आहे. आजचा न्याय हा उद्याचा अन्याय ठरू शकतो. जसा कालचा न्याय हा आज अन्याय ठरला आहे. सामाजिक बदलाच्या बाबतीत एकमेकांवरचा विश्वास आणि शतकानुशतकाचा अन्याय एका निर्णयाने दूर केला जाण्याची घाई ही समाजाला अंतिमत: घातक ठरू शकते. सबुरीने घेणे, हेच समाजाच्या मानसिकतेत कायमस्वरूपी बदल घडवून आणते, हे समाजाला पटवून देण्यात आपले विचारवंत कमी पडले, हे नाकारता येईल काय?

अन्य सामाजिक क्षेत्रांच्या बाबतीतसुद्धा प्रागतिक विचारांची कास धरणे कमी महत्त्वाचे नव्हते. केवळ बाहूंत किंवा केवळ पायांत सामर्थ्य येऊन चालेल का? केवळ मेंदू तल्लख राहून फायदा होईल का? केवळ छाती-पोट नीट असण्याने शरीर तंदुरुस्त राहील का? शरीराच्या सर्व अवयवांत समसमान शक्ती येणे महत्त्वाचे असते. समाजरूपी शरीराचेही तसेच आहे. निवडणुकांच्या गुंतागुंतीत अडकलेल्या राजकारण्यांच्या पचनी हा विचार पडणे शक्य नाही. बरे, त्यांना ते चुकत आहेत, हे सुनावण्याचे धाष्टर्य दाखवणारे विचारवंत आजच्या

आपल्या समाजात नाहीत. आणि त्यांनी सांगितले तरी ते ऐकण्याच्या मन:स्थितीत राज्यकर्ते नाहीत. म्हणूनच तर त्याच त्या गटांगळ्या खात, डुबक्या घेत समाजाचे मार्गक्रमण चालले आहे. तेही चुकीच्या मार्गावर!

प्रत्येक क्षेत्राचे आपले म्हणून एक नीतिशास्त्र असते, तत्त्वज्ञान असते. ते प्रगतिपथावर न्यावयाचे काम त्या--- त्या क्षेत्रातील विचारवंत करत असतात. प्रत्येक नवविचार हा व्यवहार्य किंवा अमलात आणण्यासारखा असतोच असे नाही. पण म्हणून विचारप्रक्रिया थांबून कसे चालेल? 'सुधारक'कार आगरकरांनी 'विचारसंघर्षांला कां भिता?' असा सवाल केला होता. आज 'वाद नको' अशी बहुतेकांची भूमिका आहे आणि मांडवली करून प्रश्न सोडविण्याकडे कल आहे. आज आपल्याकडे विचारसंघर्ष होत नाहीत. होतात ते 'चक्का-जाम', 'रास्ता रोको' किंवा 'खळ्ळ खट्याक'! 'ही विकारवशता झाली; विवेकाची कृती नव्हे,' हे निक्षून सांगणारे विचारवंत कुठे लपून बसले आहेत? हे सुदृढ समाजाचे लक्षण नाही.

आज विचारवंत म्हणवले जाणारे भरमसाट वाढले आहेत. त्यांतही सांस्कृतिक अप्रगल्भतेच्या ज्या पायरीवर आपण उभे आहोत, तेथे विशेषणांची खैरात करण्याची सवय समाजाला लागली आहे. 'ज्येष्ठ विचारवंत', 'सामाजिक विचारवंत' अशी विशेषणे सर्रास वापरली जात आहेत. अमुक अमुक विचारवंताने कोणता नवा विचार महाराष्ट्राला दिला, असे विचारता ९० टक्के विचारवंतांचे तरी अढळपद डळमळून पडेल. विचारवंतांच्या शब्दांचे वजन कमी होत होत त्यांची सामाजिक उपयुक्तता संपणे, हा खरे तर समाजाच्या दृष्टीने चिंतेचा विषय असला पाहिजे. विचारवंतांची लक्षणे कोणती, त्यांची काही वैयक्तिक आणि सामाजिक जबाबदारी आहे की नाही, वगैरे मोजपट्ट्या लावल्या तर आज आपल्यात विचारवंत उरले नसल्याचा वा मूळ प्रवाहातून ते बाहेर फेकले गेल्याचाच निष्कर्ष काढावा लागेल.

शिवाजी महाराजांच्या उदयापूर्वी संतांनी महाराष्ट्राची मनोभूमी वैचारिक मशागतीने उत्तमरीत्या नांगरली होती. त्याचा लाभ शिवरायांना झाला. इंग्रजांच्या उदयानंतर समाजात सुरू झालेल्या विचारमंथनात कित्येक समाजधुरीणांनी अवघा महाराष्ट्र ढवळून काढला. साहजिकच समाज प्रबोधनाच्या मार्गावर वाटचाल करू लागला होता. व्यक्तिगत तसेच सार्वजनिक चारित्र्य आणि सामाजिक सामीलकी यांचे नवी उंची गाठणारे आयाम ठरवू लागला होता. पण कुठेतरी माशी शिंकली आणि प्रगतिपथावर असलेला आपला समाज 'यू टर्न' घेऊन उलटी पावले टाकू लागला. सामाजिक सुधारणांच्या बाबतीत ज्या महाराष्ट्राचे नेतृत्व अख्ख्या देशाने मानले होते, तोच महाराष्ट्र सामाजिकदृष्ट्या प्रगती खुंटलेल्या अन्य राज्यांसारखा झाला. वैचारिकतेची आणि विवेकाची साथ सोडल्याने महाराष्ट्रात बरेच अनर्थ घडले. याची सर्वाधिक जबाबदारी स्वातंत्र्योत्तर काळातील विचारवंतांवर येते, यात शंका नाही.

प्रत्येक समाजाची भावनिक उंची आणि वैचारिक उंची असे समांतर जाणारे दोन प्रवाह असतात. या दोन समांतर प्रवाहांतील अंतर जितके कमी, तितके तो समाज वैचारिकदृष्ट्या पक्व, प्रगल्भ, प्रबुद्ध असल्याचे मानता येते. समाजाने विवेकवादाचा आणि बुद्धिप्रामाण्यवादाचा स्वीकार करणे, स्वातंत्र्य, समता, विश्वबंधुता, सर्वधर्मसमभाव, परमतसहिष्णुता यांसारख्या प्रागतिक विचारांना आपलेसे करणे आणि विज्ञानाची कास धरणे.. ही समाजाचा वैचारिक स्तर वरचा असण्याची लक्षणे होत.

एका विशिष्ट अर्थाने स्थितिजन्य समाजातील शांततेचा भंग करणारा विचारवंत हा मुळात समाजहितरक्षक असतो. शांत तळ्याच्या काठावर बसून तो पाण्यात दगड भिरकावतो. पाण्यावर तरंग उठतात, तसे स्थितिजन्य समाजात विचारांचे तरंग उठतात. नव्या वैचारिक प्रगतीची ती नांदी असते. हा शांतताभंग समाजाचे विचार ढवळून टाकणारा असतो. विचारवंताकडून काही अपेक्षा असतात. विचारवंताने सत्याची बाजू लावून धरली पाहिजे. त्याने नेहमी उपेक्षित वर्गाची कड घेणे अपेक्षित असते. त्याने महत्त्वाच्या प्रसंगी सामाजिक घटनांवर परखड आणि स्पष्ट शब्दांत भाष्य करणे हे त्याचे कर्तव्य असते. प्रत्येक वेळी प्रवाहपतित होऊन समाजाच्या मागे जाण्याचे टाळणे अपेक्षित असते. प्रवाहाच्या विरुद्ध पोहणाऱ्यांकडूनच समाजात बदल होण्याची अपेक्षा करता येते. तटस्थता हा त्याचा मोठा गुण असतो, तो त्याने सोडता कामा नये. महत्त्वाचे म्हणजे आपल्या मताची किंमत देण्याची त्याची सदैव तयारी हवी.

ज्या समाजातील विचारवंत आपली सामाजिक जबाबदारी पार पाडण्यासाठी सत्याची कास धरत नाहीत, आपण सत्यवचनी आणि नीतिमान असल्याचे केवळ भासवतात, पण सर्व प्रकारच्या भोंदूपणामुळे जे द्विस्तरीय जीवन जगतात; तटस्थता राखण्याचा कसोशीने प्रयत्न करत नाहीत; उपेक्षितांबद्दल नुसताच कळवळा व्यक्त करतात, पण त्यांचा पक्ष घेऊ न संघर्ष करण्यास घाबरतात; वेळप्रसंगी सत्ताधाऱ्यांना चार बोल सुनवायला कचरतात, तो समाज वैचारिकरीत्या खुजाच राहणार.

शासन–पुरस्कृत विचारवंतांची यादी प्रतिवर्षी कितीही मोठी होत राहिली, तरी शासनाच्या व सत्ताधाऱ्यांच्या मदतीवर ही वाढ अवलंबून असल्यामुळे सामाजिक जबाबदारी पार पाडण्याची क्षमता त्यांच्याकडे नसणार. विचारवंतांकडे आश्रित म्हणून पाहण्याची राज्यकर्त्यांची दृष्टी जोवर बदलणार नाही किंवा त्यांच्याकडे उपहासाच्या व तुच्छतेच्या नजरेने पाहण्याची प्रवृत्ती बदलणार नाही, तोपर्यंत शासनकर्त्यांवर नीतिमानतेचा अंकुश ठेवण्यात तथाकथित विचारवंत असमर्थच ठरणार आणि दर्जा, प्रमाण, सामाजिक सामीलकी आणि प्रगतीसारख्या समस्या अनुत्तरितच राहणार. जोपर्यंत समाजालाही केवळ लक्ष्मीचीच आराधना आणि मनोकामना करण्यातच स्वारस्य असणार, विचारांना आणि विनय, विवेक, परमतसहिष्णुता आदी सामाजिक गुणांचे बंधन मर्दानगीच्या भ्रामक कल्पनांना कवटाळत पाळले जाणार नाही, तोपर्यंत समाज विचारवंतांना मान देणार नाही. आणि जोपर्यंत विचारवंतही 'सत्तेपुढे शहाणपण चालत नाही' अशा वाक्यांच्या आड आपली भीरुता लपवत राहणार, तोपर्यंत कोणताही समाज वैचारिकतेला पारखाच राहणार. वैचारिकता ही सर्वश्रेष्ठ शक्ती आहे, हे न मानणाऱ्या समाजाची पीछेहाटच होणार. अशा समाजातील प्रगती ही फसवीच राहणार.

महाराष्ट्राचे चित्र बदलायचे असेल तर विचारवंतांकडे पाहण्याचा राज्यकर्त्यांचा दृष्टिकोण बदलायला हवा. समाजालाही विचारवंत कोण, हे ओळखण्याची सवय लागली पाहिजे. आणि महत्त्वाचे म्हणजे विचारवंतांना स्वत्व ओळखून आपली सामाजिक जबाबदारी पार पाडण्याची ऊर्मी आली पाहिजे.

'लोकसत्ता'च्या सौजन्याने

aroontikekar@gmail.com

■■

# वैकल्पिक माध्यमांसमोरील आह्वाने

*अनुराधा मोहनी*

माध्यम चळवळ युवा

*('साम्ययोग साधना' ह्या वैचारिक साप्ताहिकाचा हीरक महोत्सव जानेवारी २०१५ मध्ये धुळे येथे संपन्न झाला. येथे परिवर्तनवादी चळवळींतील नियतकालिकांना भेडसावणाऱ्या प्रश्नांशी संबंधित वेगवेगळ्या मुद्द्यांना धरून चार परिसंवादांचे आयोजन करण्यात आले होते. सर्वच विषयांवर चांगले विचारमंथन व उद्बोधक चर्चा घडून आली. श्रोत्यांनीही चांगला सहभाग घेतला. अशा प्रकारे ह्या विषयावरील चर्चा महाराष्ट्रात तरी बऱ्याच वर्षानंतर झाली असावी. त्यातील एका चर्चासत्राच्या अध्यक्षपदावरून आ.सु. च्या माजी कार्यकारी संपादकांनी केलेले हे भाषण. -का.सं.)*

'भौतिक ताळमेळ बसवताना जमिनी कार्यकर्त्यांना वाचन, लेखन, चिंतन करण्यास प्रवृत्त करण्यासाठी वैकल्पिक माध्यमे कमी पडत आहेत'. हा आजच्या व्याख्यानाचा विषय आहे.

रोजचे जीवन जगताना, दैनंदिन अडचणींना सामोरे जाताना, कार्यकर्त्यांनी वेळ काढून वाचन, लेखन, चिंतन करायला पाहिजे, पण त्यासाठी त्यांना वेळ व निवांतपणा मिळत तर नाहीच, परंतु त्याहूनही, साहित्य मिळत नाही. मुख्य प्रवाहातील माध्यमे म्हणजे वर्तमानपत्रे, रेडियो, टीव्ही, ही बातम्या म्हणजे माहिती देणारी माध्यमे आहेत. ती विचारास प्रवृत्त करीत नाहीत. विचार कशाचा, तर कार्यकर्त्यांनी आपले कार्य काय आहे, ते कसे साध्य करायचे, ते साध्य झाल्यावर आपल्याला कुठे घेऊन जाणार आहे, आपले गंतव्यस्थान कोणते आहे, मी आणि माझे काम ह्याचा माझ्या सभोवतालाशी संबंध कोणता ह्याबाबत वैचारिक स्पष्टता येण्यासाठी जे करायचे ते लेखन, वाचन व चिंतन.

जमिनी कार्यकर्ते म्हणजे जमिनीवर घट्ट पाय रोवून उभे असलेले कार्यकर्ते. ह्यात रा स्व संघ व नक्षलवादी ह्या दोहोंना सोडून समाजवादी, मार्क्सवादी, आंबेडकरवादी व गांधीवादी विचारांचे, कामगार संघटना, राजकीय पक्ष, स्वयंसेवी संस्था आणि चळवळी–आंदोलने ह्या सर्वांमध्ये काम करणारे कार्यकर्ते, ज्यांच्यासाठी ह्यानंतर आपण अशी संज्ञा वापरली जाईल.

वैकल्पिक माध्यमे म्हणजे साप्ताहिक 'साधना', 'समाज प्रबोधन पत्रिका', 'नवभारत' 'आजचा सुधारक', 'मिळून साऱ्याजणी', 'आंदोलन', 'परिवर्तनाचा वाटसरू', 'बायजा', 'प्रेरक ललकारी', व 'सगुणा' ह्यांसारखी नियतकालिके.

कार्यकर्त्यांना लेखन, वाचन व चिंतनाची गरज ह्यासाठी आहे की वैचारिक स्पष्टतेचा अभाव आज खरोखरीच आहे. आपल्या साध्यांवर व साधनांवर आपली पकड राहिली नाही. आज आपल्यासमोर अस्तित्वाचेच संकट उभे राहिले आहे आणि तरी आपण बेसावधच आहोत. उजव्या शक्तींचे आह्वान आपण समजूच शकलेलो नाही. पुढेही अशीच परिस्थिती राहिली तर आणखी पाच वर्षांनी आपण असे उभे राहून बोलू शकू की नाही ह्याचीही शंका वाटते. कारण चळवळी व विचारप्रसारासाठी सर्वात प्रभावी मानले गेलेले माध्यम म्हणजे वैचारिक नियतकालिके, ही त्यासाठी कमी पडत आहेत.

पहिली गोष्ट अशी की कोणता विचार द्यायचा ह्याबाबतच आपल्या मनात संभ्रम आहे. आत्ता मी ज्यांची नावे घेतली ती सर्वच मुखपत्रे आहेत.. म्हणजे एक विशिष्ट विचारधारा, एखादा वाद, एखादे राजकीय पक्षाचे धोरण ठामपणे लोकांपुढे ठेवण्यासाठी निर्माण झालेली आहेत (अपवाद फक्त 'आजचा सुधारक'चा. कारण ते कोणत्याही एका विचाराला व चळवळीला बांधून घेतलेले मासिक नाही.) पण त्यांच्यात त्याच्याबद्दल स्वतःकडे पूर्ण अभ्यास, आजच्या परिस्थितीत हीच विचारसरणी तारून नेईल ह्याबद्दल ठाम एकमत, मांडणीचे व युक्तिवादाचे कौशल्य हे असले पाहिजे. तरच वेगवेगळ्या संकटांना ती (विचारसरणी) कशी उत्तरे पुरवते हे शैलीदारपणे उलगडून दाखवता येईल. दुसऱ्या विचाराचे वा टीका/विरोध करणारे लेख आवर्जून प्रकाशित करून त्यांना संयमाने उत्तरे दिली पाहिजेत. आजचा सुधारकने हे काम सातत्याने व चिकाटीने अनेक वर्षेपर्यंत केले हे मला येथे अभिमानाने सांगावेसे वाटते. शंका वा प्रश्न विचारण्यास कार्यकर्त्यांना उद्युक्त केले पाहिजे. आपल्या विचाराच्या काही मर्यादा असल्या तर त्या (आतल्या गटात तरी) मान्य केल्या पाहिजेत. अशा रीतीने वाचकांचा परिघ वाढवत नेला तर convincing the non convinced हे आपल्याला करता येईल. नाहीतर आजच्या वैचारिक वायाला जे अगदी मिळमिळीत स्वरूप आले आहे, त्यातून काहीही साध्य होणार नाही. तसेच आपल्याला जी विचारसरणी मांडायची आहे, तिच्यामधील वेगवेगळ्या छटांचे तरी प्रतिबिंब त्यात पडते का? उदा. सर्वोदयाचे मासिक असले तर विनोबा – जयप्रकाश वादाबद्दल त्यामध्ये काही बोलले जाते का, हे पाहिले पाहिजे. वैचारिक माध्यमांमध्ये काहीतरी रसरशीत, चैतन्यमय असले तरच ते कार्यकर्त्यांना आकर्षून घेईल. केवळ मोठ्या लोकांच्या निधन वार्ता व मृत्युलेख देऊन ते होणार नाही.

विचारानंतरचा पुढचा मुद्दा व्यवस्थापनाच्या धोरणाचा आहे. काही नियतकालिके – जसे की आजचा सुधारक किंवा डाव्या चळवळीची काही मासिके धोरणानुसार फक्त मूठभर बुद्धिजीवींसाठी सुरू केलेली असतात. पण बाकीची वैचारिक माध्यमे ही तशी नाहीत. ती खुली आहेत व तसे असलेही पाहिजे. धोरण हे जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्याचेच असावे. कारण अनेक व्यक्तींमध्ये कार्यकर्ता दडलेला असू शकतो व त्याला ते वाचून प्रेरणा मिळू सकते.

व्यवस्थपकीय धोरणाबरोबरच नियतकालिकांसाठी बळकट आर्थिक व्यवस्थाही गरजेची आहे. त्याचा पहिला मार्ग म्हणजे नियमितपणे व काटेकोरपणे पुरेशी वर्गणी जमा करणे, त्यासाठी वर्गणी जमा करण्याची सोपी पद्धतही असली पाहिजे. मिळून साऱ्याजणी' व 'परिवर्तनाचा वाटसरु' ह्यांनी प्रत्येक जिल्ह्यात प्रतिनिधी नेमला आहे. हेही सर्वांना शक्य होणार नाही. ऑनलाइन भरण्याची सोय हे त्यावर उत्तर असू शकते.

पत्रकारितेत, निधी उभारण्यासाठीचा पहिला मार्ग म्हणून जाहिरातींकडे पाहिले जाते. त्यावरही वैचारिक माध्यमांमध्ये बरीच भवति न भवति चालू आहे. त्यावर मला असे वाटते की जाहिरातींना पूर्णपणे नाही म्हणू नये. जाहिराती नाकारण्याचे धोरण त्यातून मिंधेपणा येऊ नये ह्यासाठी होते. तेव्हा ते न येऊ देता जाहिराती घेता आल्या तर घ्याव्यात. वैकल्पिक माध्यमांना स्वत:चा असा एक सूर, एक मूड, एक पावित्र्य असते. त्याला धक्का न लावता जाहिराती छापायला हरकत नाही. परंतु त्याचबरोबर हेही लक्षात ठेवले पाहिजे की आपल्यासारख्या कमी खपाच्या मासिकांना जास्त जाहिराती मिळणार नाहीत, कारण जाहिरातदारांना जाहिरातीतून त्यांच्या त्या उत्पादनाचा खप होऊन त्यातून परतावा अपेक्षित असतो. एकूण काय, तर हा निर्णय व्यक्तिगत पातळीवर प्रत्येकाने तारतम्यानेच घ्यायचा आहे. जाहिरातींच्याशिवाय देणग्याही घेता येतील. त्या फारतर 'देणगी देणाऱ्यावर टीका करण्याचा आमचा हक्क अबाधित ठेवून आम्ही हिचा

स्वीकार करीत आहोत' अशा अर्थाचा करार करून स्वीकारता येतील. असे करण्यास काहीच हरकत नाही व अशा मार्गाने पैसे उभारणे फार कठीण नाही असे मला वाटते.

अर्थव्यवस्था उभारताना छापील माध्यमाचा एक गुण आपल्या कामी येणार आहे. छापील प्रतींची संख्या वाढवल्यावर त्याच प्रमाणात खर्च वाढत नाही. काही अंकांची छपाई झाली की पुढे फक्त कागद आणि मुद्रण ह्यांच्याच खर्च, व तो अगदी कमी येतो. (कितीही प्रती काढल्या तरी त्याचा तेवढाच खर्च होणारे नवीन मुद्रण- तंत्रज्ञान आले आहे, परंतु त्याचा प्रसार झाला नसल्यामुळे तो विचार येथे केलेला नाही.) त्यामुळे वर्गणीदार वाढविणे हाच सगळ्यांत महत्त्वाचा मार्ग आहे. त्यासाठी अनेक चांगले उपाय योजता येतील. एकमेकांच्या मासिकांमध्ये आपल्या जाहिराती करणे हा त्यापैकी एक असू शकेल. आजीव वर्गणीदार ही गोष्टही पुढील काळात अवघड आहे.

वैकल्पिक माध्यमे निस्तेज होण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे गेल्या ५० वर्षांत महाराष्ट्रातील आंदोलनांचा जोर ओसरला. आज अंधश्रद्धा-निर्मूलन व नर्मदा बचाव हीच दोन आंदोलने क्षीण स्वरूपात चालू आहेत. बाकी शेतकरी आंदोलन, स्त्रीमुक्ति आंदोलन, पुरुष संवेदनशीलता आंदोलन, दारूबंदी-व्यसनमुक्ती, मिल मजुरांचे, शासकीय कर्मचाऱ्यांचे ही सर्व आंदोलने, ज्यांना ६० -७० च्या चळवळीत लोक चळवळीचे स्वरूप आले होते. ती आता दिसत नाही. ती दाहकता आता त्यांच्यात उरली नाही. त्यामुळे त्या चळवळींना शब्द, परिभाषा, शैली व साहित्य पुरवणाऱ्या मासिकांना उतरती कळा लागली आहे. आजच्या तरुणांना चळवळीचा इतिहास माहीत नाही. आजची भांडवलशाही त्यांना वेगळी सुखाची स्वप्ने दाखवीत आहे. ती स्वप्ने अगदी जवळ असल्याचा आभास निर्माण करीत आहे. त्यामुळे आपण कोणत्या व्यवस्थेचा भाग आहोत, ती आपल्यावर व इतरांवर - विशेषतः खालच्या वर्गावर कसा अन्याय करते आहे, आपण आपली तरुणाई पणाला लावून ती व्यवस्था बदलू शकतो, तसे करण्याचा अधिकार आपल्या काळांनेच आपल्याला दिला आहे, ह्याची त्यांना कल्पना नाही. या तरुणांच्या विचारपद्धतीचा फटकाही आजच्या वैकल्पिक मासिकांना बसतो आहे.

**वाचकवर्गाचे व्यवस्थापन** - म्हणूनच शहरांतील सवर्ण, सुशिक्षित, उच्च विद्याविभूषित वर्ग - मग तो प्राध्यापक का असेना - जो आता आतापर्यंत आंदोलनांचा व वैचारिक मासिकांचा आश्रयदाता होता, तो याच्यानंतर तसा राहणार नाही. या उलट निमशहरी, तालुक्याच्या ठिकाणी असलेला नवसाक्षर वर्ग, तरुण वर्ग, जो परिवर्तन घडवून आणायला इच्छुक आहे, ज्याच्याकडे ती प्रेरणा आहे, तोच त्यांचा पुढील काळातील आश्रयदाता राहणार आहे. अर्थात, इथेही एक गोची आहे. ती अशी आहे की त्यांनाही आजची भांडवलशाही स्वप्ने दाखवीत आहे, प्रलोभने दाखवीत आहे, ती त्यांच्या फार जवळ नसली, तरी आवाक्यात आहेत. ती हस्तगत करण्याचा मार्ग आपण ज्याला व्यवस्थाबदल किंवा समाजपरिवर्तन म्हणतो, त्यापेक्षा फार वेगळा, किंबहुना विरुद्ध दिशेचाच आहे. तरी देखील त्या तरुण वाचक वर्गाला - त्यातही विशेषतः तरुणींना - मोठ्या कौशल्याने व कष्टपूर्वक आपल्याकडे वळवून घ्यावे लागणार आहे. ग्रामीण भागातील तरुणी हा येत्या काळातील फार महत्त्वाचा क्षम वाचकवर्ग आहे. कारण त्या पुढील काळातील परिवर्तनाच्या वाहक आहेत. लक्ष्यित वाचकवर्ग म्हणून स्त्रियांचा विचार आजपर्यंत कोणत्याही नियतकालिकाने केलेला नाही. वैकल्पिक माध्यमांनी तो जाणीवपूर्वक केला पाहिजे.

**भाषा** - वाचक वर्ग डोळ्यासमोर आल्यावर त्यांच्याशी कोणत्या भाषेत बोलावे लागणार आहे ते उघडच आहे. त्यांना समजेल, आवडेल, पचनी पडेल असे शब्द, अशी भाषा, अशी शैली जाणीवपूर्वक घडवून तिचा वापर करावा लागेल. याचा अर्थ भाषेचे सुलभीकरण नव्हे. मी मुळीच त्याच्या बाजूची नाही, उलट विरोधातच आहे. मुद्दा असा, की भाषेचा फापटपसारा न मांडता, कमी शब्दांत, ओघवत्या व निश्चितार्थक भाषेत मांडले, तर तिला भारदस्तपणा व डौल प्राप्त होतो. अशी भाषा विचारांना उत्तम प्रकारे वाहून नेऊ शकते. भोंगळ व ढिसाळ भाषा हे काम करू शकणार नाही. ती पैलू पाडलेली, सुंदर, सुघटित हवी. त्याचप्रमाणे व्याकरण व लेखनवाचनाचे नियम हे पाळलेच पाहिजेत. जेवढ्या प्रमाण भाषेत आपण लिहू, तेवढी वाचकांच्या वाचनाची गती वाढेल. व त्यांना वाचनाची सवय लागेल. तर, चांगली भाषा वाचण्याची सवय आपल्या वाचकांना लावणे हेही एक कठिण आव्हान आपल्यासमोर आहे. इंग्रजी लिहिताना स्पेलिंग व व्याकरण याबद्दल आपण जेवढे जागरूक असतो, तेवढे मराठीबद्दल असत नाही. यातून, आम्हाला कसले आलेत नियम?, असा न्यूनगंडच आपण व्यक्त करीत नाही का? हा गंड पुढील पिढीकडे संक्रमित होऊ नये म्हणून प्रमाणपद्धतीने लिहिणे आवश्यक आहे. लेखन व मुद्रण हे लेखांकन

(documentation) आहे, ते पुढे बराच काळ टिकून राहणार आहे, वाचले जाणार आहे, त्यामुळे ते प्रमाणभाषेत व उत्तम शैलीतच लिहिले गेले पाहिजे.

या माध्यमांचे लेखक हे थोर विद्वज्जन वा विचारवंतच नव्हे तर कार्यकर्ते व इतर सर्वसामान्यही राहणार आहे. तेव्हा त्यांचे अनुभव, त्यांच्या अडचणी व समस्या, त्यांवर त्यांना सुचणारे उपाय इ. गोष्टी त्यांच्याकडून लिहून घेतल्या पाहिजेत. पण त्याही चांगल्या भाषेतच लिहून घ्याव्यात, अन्यथा संपादकाचे काम फार वाढते. येथून आता आणखी एक मुद्द्याकडे वळावे लागेल. आजच्या वैचारिक मासिकांचे संपादन. अनेक मासिकांमध्ये आज मजकूर जसा आला तसाच, संपादकीय संस्कार न करता सरळ छापला जातो. हा शुद्ध गलथानपणा आहे. ह्याने वाचकवर्ग कधीच आकर्षिला जाणार नाही. चिंतन व मनन तर दूरच राहिले. काही ठिकाणी तर इतकी ढिसाळ भाषा वाचनात येते की लेखकाला काय म्हणायचे आहे. तेच कळत नाही. आजची मराठी वर्तमानपत्रे, टिव्हीवरील मराठी शीर्षके ही गलथानपणात अग्रेसर आहेत. पण आपण तसे करू नये. महाराष्ट्राला उत्तम लेखक व पत्रकारांबरोबरच उत्तम संपादकांचाही परंपरा लाभली आहे. ती टिळक आगरकरांपासून सूरू होते. साने गुरुजी, श्री. पु. भागवत, अरुण टिकेकर हे सर्व त्या परंपरेचे पाईक आहेत. संपादन म्हणजे लेखकाकडून आपल्याला हव्या त्या विषयावर लिहून घेतल्यावर अलगद मायेचा हात फिरवून म्हणजे कमीत कमी बदल करून वाचकांना समजेल व नियतकालिकाच्या चौकटीत बसेल अशा रूपात मजकूर सादर करणे. हे एक वेगळे कौशल्यच नाही, तर कला आहे. आज त्याला प्रतिष्ठा राहिली नाही, अन्यथा आपली परंपरा इतकी विस्मृतीत जाती ना. पण आपण ती पुन्हा मिळवून द्यावी. काही कार्यकर्ते, आपण फक्त काम करणारे, लिहिणे हे दुसऱ्याचे काम असे मानतात. पण हा विचार योग्य नाही. डायरी हा कार्यकर्त्याच्या आयुष्याचा भाग असतो.

**रंजकता** – आपल्या माध्यमांमध्ये रंजकता कशी आणावी ह्याचाही विचार होणे आवश्यक आहे. तात्त्विक वा बौद्धिक चर्चा ही लांब तोंड करूनच करायची असते असा पूर्वी एक समज होता. आजचा सुधारकच्या सुरुवातीच्या काळात विवेकवाद्यांना हसताही येते का? अशा शीर्षकाचा लेख आला होता. आता तर काही तसा समज नाही, आणि असला तरी आपण तो बदलला पाहिजे. व्यंग्यचित्रे, रेखाचित्रे, छायाचित्रे, परिपूरके, मुखपृष्ठ ह्या सगळ्याकडे लक्ष देऊन रंजकतेचे मूल्य वाढवत नेले पाहिजे.

**तंत्रज्ञान** – इलेक्ट्रॉन माध्यम हे कमीत कमी वेळात जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्याचे माध्यम आहे. त्याच्या गतिशीलतेसाठी त्याचा वापर करायलाच पाहिजे. माहितीचे तुकडे भराभर इकडेतिकडे फिरवण्यासाठी व ते लोकापर्यंत पोहोचवून त्यांचे मत बनविण्यासाठी वा बदलण्यासाठीही त्याचा उपयोग होईल. एकच गोष्ट वेगवेगळ्या रूपात पुन्हा पुन्हा सांगून ठसा उमटविण्यासाठीही त्याचा उपयोग करतात. आपणही त्याचसाठी तो केला पाहिजे. कार्यकर्ता हा अनेकदा एकाकी असतो. त्याला कुटुंबाचा वा मित्रमंडळीचे पाठबळ असतेच असे नाही. हे इथे जमलेल्या आपणा सर्व कार्यकर्त्यांना माहीत आहे. तेव्हा त्यांना कायदेशीर वा आवश्यक असेल अशी अन्य तांत्रिक माहिती देणे, अडचणीत असलेल्या कार्यकर्त्याला सहानुभूती वा धीर देणे, वेगवेगळ्या संस्था-संघटना-गावामध्ये विखुरलेल्या कार्यकर्त्यांना एका सूत्रात गोवून त्यांच्यात बंधुभाव निर्माण करणे ह्यासाठी इंटरनेट व सोशियल नेटवर्कचा उपयोग करून घेता येईल. त्यातूनच आपल्या पाठीशी अनेक लोक आहेत असा दिलासा कार्यकर्त्यांना वाटू शकतो आणि त्याने मन शांत होऊन तो लेखन-वाचन-चिंतनाकडे वळू शकतो. म्हणून प्रत्यक्ष वैकल्पिक माध्यम म्हणून नसले तरी त्याला पूरक म्हणून इंटरनेट व तत्सम माध्यमांचा वापर होऊ शकेल.

आजची वैकल्पिक माध्यमे, कार्यकर्त्यांना वाचन-चिंतन-मननास उद्युक्त करण्यास कमी पडत आहेत. त्यांनी अधिक चैतन्यपूर्ण बनून वाचकवर्ग कसा आकर्षित करावा यासंबंधीचे मुद्दे मी आपल्यासमोर मांडले. कुठलीही जाहिरात न घेता वा कुठल्याही विचारसरणीस बांधून न घेता गेल्या पंचवीस वर्षापासून केवळ विवेकवादी चिंतनाला वाहिलेल्या आजचा सुधारक ह्या मासिकाचे मॉडेल एक पर्याय म्हणून आपल्यापुढे ठेवायचे आहे. ह्यात हेच सर्वोत्तम असल्याचा दावा नाही, पण ह्या मॉडेलचा विचार व्हावा अशी इच्छा आहे. नागपुरातील एक तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक दि.य. देशपांडे ह्यांनी, आपल्या तेजस्वी लेखक व उच्चविद्याविभूषित पत्नी प्रा. म. गं. नातू ह्यांच्या स्मृतिदिनी १९९० साली आजचा सुधारकची मुहूर्तमेढ रोवली. पहिली आठ वर्षे तेच संपादक होते. त्यानंतर मुख्यतः त्यांनी ठेवलेल्या ठेवीमधूनच आजवर आजचा सुधारकचा प्रपंच चालला आहे. आजीव वर्गणीदार सुरुवातीच्या काळात केले. वार्षिक वा त्रैवार्षिक वर्गणी स्वीकारली. लेखक संपादकांना मानधन नाही. आज हे कुणाला कालबाह्य वाटेल, परंतु अशा रीतीने ते चालले व आजही, वाचकवर्ग कमी असला तरी

महाराष्ट्रातील वैचारिक मासिकांमध्ये निष्पक्षपातीमुळे त्याचा क्रमांक बराच वरचा लागतो. सुरुवातीच्या काळात धर्मादि विषयांच्या तात्त्विक चिंतनावर भर होता. आता नैतिक – अनैतिकतेच्या योग्यायोग्यतेच्या चर्चेस प्रवृत्त करतील असा कोणत्याही विषयावर वादविवाद किंवा विमर्श केला जातो – मग तो शेती असो, शिक्षण असो वा भाषाव्यवहार. अशा रीतीने वैचारिक मासिक चालविणे सहज शक्य आहे हे मी संपादनकाळातील माझ्या अनुभवावरून आपणा सर्वांना आवर्जून सांगू इच्छिते. तेव्हा पैसे, व्यवस्थापन, भाषाशैली ह्या सर्वांचा विचार अवश्य करावा, परंतु बाऊ करू नये. कारण मेंदूतील विचार व अंतःकरणातील तळमळ ह्या सर्वापेक्षा जास्त महत्त्वाची आहे. तेव्हा आपण सर्वांना सुयश चिंतिते व ह्या मासिकाकडून वैकल्पिक माध्यमांना प्रेरणा मिळेल अशी सदिच्छा व्यक्त करून मी आटोपते घेते.

*(दि. १० व ११ जानेवारी २०१५ रोजी धुळे येथील साम्ययोग साधनाच्या हीरक महोत्सवप्रसंगी वरील विषयाच्या परिसंवादाच्या अध्यक्षपदावरून केलेले भाषण.)*

anumohoni@gmail.com

■■

# कलाकृती आणि समाज

*डॉ. राजीव जोशी*

समाजकारण विवेक चिकित्सा

मी ललित किंवा तत्सम साहित्य क्वचितच वाचले आहे. श्री भालचंद्र नेमाडेंना पुरस्कार मिळाल्यानंतर त्यांच्या लेखनाच्या साहित्यिक आणि सामाजिक मूल्यांची अधिक चर्चा होणार आहे. कलामूल्यांपेक्षा मी कलाकृतीच्या सामाजिक परिमाणाला अधिक (कदाचित अवास्तव) महत्त्व देतो. परंतु प्रत्यक्ष लिखाण न वाचता (आणि तसे परिश्रम न घेता) काही एक सर्वसाधारण स्वरूपाचे विचार व्यक्त करता येतात.

नेमांडेंचा स्वतःचा दृष्टिकोन स्पष्ट आहे – मी परंपरेचे जे समर्थन करतो ते नीरक्षीरविवेकाने परंपरेचा अर्थ लावण्याच्या बाबतीत म्हणतो आहे. कुठल्याही माणसाला तो ज्या घरात जन्मतो, ज्या धर्मात जन्मतो, ज्या प्रदेशात जन्मतो, तिथली शेकडो वर्षांची परंपरा त्याला आपसूक वारशाने मिळते. ही परंपरा अनेक विद्वान, बुद्धिप्रामाण्यवाद्यांनी वैचारिक मंथन करून आणि संघर्ष करून घडवलेली असते. त्यातले स्वत्व कोणते आणि फोलपटे कोणती, हे ज्याने त्याने ठरवायचे असते. त्यानुसार परंपरेचा धागा पुढे नेणे अपेक्षित असते. या अर्थाने मी परंपरेचे महत्त्व मानतो, याचा अर्थ परंपरेतल्या हीन गोष्टींना माझा पाठिंबा आहे, असे मानणे चुकीचे आहे.'' (भालचंद्र नेमाडे यांच्या पंच्याहत्तरीनिमित्त अनौपचारिक गप्पा, लोकसत्ता ३१ मे २०१३)

'ही परंपरा अनेक विद्वान, बुद्धिप्रामाण्यवाद्यांनी वैचारिक मंथन करून आणि संघर्ष करून' घडविली हे त्या काळाला सापेक्ष आहे. 'त्यातले स्वत्व कोणते? यानुसार परंपरेचा धागा पुढे नेणे' या विचारांमध्ये 'जरूर तेथे आणि आवश्यक तर ती नाळ साफ तोडून टाकणे, वेगळीच किंवा विरुद्ध दिशा स्वीकारणे' याला स्थानच नाही असेच सूचित होते.

भाजपचा देशीवाद आणि मी मांडत असलेला देशीवाद यांच्यात कुणीही गल्लत करू नये असे ते म्हणतात (किता). ते विवेकापेक्षा प्रादेशिकतेलाच महत्त्व देतात, त्यामुळे भावनिकतेचे उदात्तीकरण संभवते.

'हिंदू कादंबरी प्रसिद्ध झाल्यापासून घेतला जाणारा एक नवीन आणि महत्त्वाचा आरोप म्हणजे या कादंबरीत त्यांनी सरळसरळ प्रतिगामी भूमिका घेतली आहे. आधुनिकतेला विरोध ठीक आहे, पण त्यासाठी त्यांनी जातिव्यवस्थेचे उदात्तीकरण करून कालचक्र उलटे फिरवण्याचा प्रयत्न केला आहे' असेसुद्धा त्यांच्याबाबत म्हटले गेले आहे. (–डॉ. आशुतोष दवाण, महाराष्ट्र टाईम्स, २७ ऑक्टोबर २०१३)

आज आपणाला काय हवे? हे महत्त्वाचे असते. जुन्या विचारात एखादी बाब चांगली आहे असे आज जाणवत असेल तर ती स्वीकारण्यात काहीच अडचण येऊ नये. पण जुन्या विचारांची ओढाताण करुन आज आवश्यक विचारांशी सुसंगत ते आहेत असे भासविण्याचा प्रयत्न नको.

आधाराचे खांब तंतोतंत लंबरूप असणे समजा झोपडीला किंवा एक मजली इमारतीला आवश्यक नसेल पण, जसजसे इमले चढत जातात तसतसा काटेकोरपणा आवश्यक होत जातो. समाज अधिकाधिक काळ निकोप ठेवावयाचा असेल तर काटेकोर, चिकित्सक आणि संशयात्मा असणे अपरिहार्य असते. तसेच ही सामाजिक व्यवस्था कोणत्या विचारांना आणि किती प्रमाणात प्रोत्साहन देते, उचलून धरते याची चिकित्सा जात, धर्म, प्रदेश, राष्ट्र अशा चौकटीबाहेर जाऊन करणे गरजेचे होते.

dr.rajeevjoshi@yahoo.com

■■

## कुठे नेऊन ठेवला विवेक तुमचा?

*मिलिंद सोनटक्के*

जात-धर्म विवेक

(वैधानिक इशारा – कृपया भावनिक लोकांनी वाचू नये, भावना दुखावल्यास लेखक जबाबदार नाही)

आजच्या अनिश्चिततेच्या सामाजिक, आर्थिक परिस्थिती सामान्य माणसाला असुरक्षित वाटते आहे. त्यामुळे त्याच्यात दैववादीपणा वाढत चालला आहे. आपले कोण? परके कोण? याबाबत संभ्रम वाढत चालला आहे. त्या भीतीतून सामान्य माणूस स्वतःभोवती वेगवेगळी कुंपणे तयार करायला लागला आहे. मग ती धार्मिक, जातीय, प्रादेशिक, भाषिक, आर्थिक कोणती का असेना. भीतीमुळे जे जुने, ओळखीचे आहे तेच धरून बसण्याची भावना व कृती नैसर्गिकच असते.

हे सांगायचे कारण की, नेमकी हीच अवस्था पुरोगामी, सामाजिक, विवेकी चळवळीतील लोकांची झालेली दिसत आहे. तोही अस्वस्थ होत आहे. ज्या कुंपणांमुळे माणूस माणसापासून दूर होत चालला आहे ती कुंपणे तितक्याच वेगाने तोडण्याचा प्रयत्न करत आहे. खरे तर त्याने लोकांतील असुरक्षिततेची, संभ्रमाची भावना कमी करण्याची गरज आहे. त्यासाठी स्वतःभोवतीची कुंपणेही तोडण्याची गरज आहे व परिस्थितीचा साकल्याने अभ्यास करण्याची गरज आहे.

केवळ प्रतिगामी लोकांवर टीका करणे, निषेध-मोर्चे काढणे, असे त्यांच्या गाडीचा वेग नियंत्रित करण्याचे उपाय केले जात आहेत. त्यामुळे पुरोगामी गाडीच्या इंजिनाला इंधन पुरवणे, गती देणे यासाठी त्यांना उसंतच मिळेनाशी झाली आहे किंवा त्याबाबत मर्यादा जाणवत आहेत. आपले प्राधान्य कायम आपल्या ध्येयाकडे लक्ष ठेवून मार्गक्रमण करण्याकडे पाहिजे. दुसरा पुढे जाईल म्हणून त्याच्या पायात पाय घालत बसले तर आपला प्रवास त्याच्या पायाशीच थांबतो. तुमची ऊर्जा तुमची क्षमता वाढवण्यावर केंद्रित करायला हवी. तुमची एक पुरोगामी, विवेकी, समाजाभिमुख विचारधारा आहे. तो तुमचा मार्ग आहे. त्यावरून ठामपणे चालत राहणे हा खरा उपाय आहे.

आपणही ज्या समाजसुधारकांचा वारसा सांगतो ते फुले, शाहू, आंबेडकर, आगरकर, कर्वे, आमटे यांनी आपल्यामागे किती लोक येतात, राहतात याची कधी चिंता केली होती? ते आपली क्षमता व निष्ठा वाढवत होते. प्रवाहाविरुद्ध पोहण्याची भूमिका आपण जाणीवपूर्वक घेतलेली आहे. त्यामुळे प्रवाहाने होण्याऱ्या विरोधाबद्दल सतत तक्रार करून काहीही साधणार नाही आणि असे बदल व्यक्तिगत पातळीवरच होत असतात त्यामुळे संवादही व्यक्तिगतच हवा. आपण लोकांना वेगवेगळ्या कप्प्यांत न टाकता त्याचा व्यक्ती म्हणून विचार करायला हवा. किमान आपला चष्मातरी नितळ हवा.

बाबासाहेबांनी मनुस्मृती जाळली. का? आपल्याला दर वर्षी स्मृतिदिन साजरा करता यावा म्हणून, की मनुवाद्यांना टोमणे मारायला आपल्याला कारण मिळावे म्हणून. माझ्या मते त्यांनी मनुस्मृति जाळली याचा अर्थ त्यांच्यापुरता तो विषय संपला. त्यांची आपल्याकडूनही

तशीच अपेक्षा असणार. ते काही २१ वेळा पृथ्वी मनुस्मृती विरहित करीन असे म्हणाले नाहीत. बाबासाहेबांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञा त्यांतील $^{1}/_{3}$ हिंदू देव, परंपरा नाकारणाऱ्या आहेत. चार पिढ्यांनतरही त्या का वाचाव्या लागतात? ज्यांचा गीता, मनुस्मृती यांना विरोध आहे तेच याविषयीचा जास्त अभ्यास करताना दिसत आहेत. गीता राष्ट्रीय ग्रंथ करणार म्हटल्यावर सगळे गीता उघडून त्यातील चुका शोधत बसले आहेत. आज ९० वर्षानंतरही आपल्या हातांत, मनांत, डोक्यांत मनुस्मृती, गीता असेल तर आंबेडकरांची कृती वायाच गेली असे म्हणावे लागेल.

संविधान राष्ट्रीय ग्रंथ असावा असे जर तुमचे म्हणणे असेल तर त्याचा प्रचार करणे हे खरे काम आहे. तुमची स्वतःची पुस्तके, अभ्यासक्रम, कार्यक्रम असा काही नाही का? समाजशास्त्र, मानसशास्त्र, आर्थिक हितसंबध यांचा अभ्यासकरून तो लोकांना समजेल अशा शब्दात सांगितला पाहिजे. जे केवळ पोटाला देतात म्हणून, त्यांची 'जय' म्हणाणारे, कोट्यवधी लोक आज या देशात आहेत. मग ते कोणत्याही देवा-धर्माची 'जय' म्हणणारे असोत किंवा राजकारण्यांची 'जय' म्हणणारे असोत, त्याच्यासाठी तुमच्याकडे काय पर्याय आहे? त्यांच्याबद्दल राज्यघटनेची काय भूमिका आहे? आणि ती तुम्हाला मान्य आहे का? संविधानातील सर्व गोष्टी तुम्हाला मान्य आहेत का? त्या संदर्भात स्वतःची चिकित्सा तुम्ही केलीत का? अजूनही लोकांचे तुमच्याबद्दल काही प्रश्न, शंका आहेत ते त्यांना विचारायला हवेत, त्यांची उत्तरे द्यायला हवीत. माहीत नसतील तर शोधायला हवीत.

तुम्ही घटना मानता, त्या घटनेने सर्व नागरिकांना धर्मपालनाचे व धर्मप्रचाराचे स्वातंत्र्य दिले आहे. त्याच प्रमाणे तुमचा जो काही विवेकी, मानवता, समता, बंधुता मानणारा सार्वजनिक सत्यधर्म असेल त्याचे तुम्ही पालन करा. त्याचा प्रचार करा. त्याचे स्वातंत्र्य घटनेने तुम्हालाही दिलेले आहे. मग दुसऱ्यांना विरोध करण्यात तुमची शक्ती का वाया घालवता? समाज बदलावा असे वाटत असेल तर तुमच्या धर्माची मूल्ये, तत्त्वे तुमच्या जीवनात ठळकपणे दिसायला हवीत. केवळ तुम्ही म्हणता म्हणून, त्यांचा धर्म वाईट, तुमचा धर्म चांगला, हे लोक कसे मान्य करतील.

जाती – अंत झालाच पाहिजे अशा घोषणा आपण देतो, तेव्हा आधी आपण ती सोडली पाहिजे. जाती-अंताच्या प्रक्रियेतही सवर्णांनीच पुढारीपण करावे अशी अपेक्षा का आहे ? सगळ्यांनाच नास्तिक होणे शक्य नाही हे मान्य, पण मग किमान सरकारी नोंदीत तरी आपण निधर्मी आहोत हे नोंदवले पाहिजे. सरकारला जर आकड्यांची भाषा कळत असेल तर त्यांच्या दफ्तरी निधर्मी लोकांचा आकडा वाढताना दिसायला हवा. जर तुमचा तुमच्या देवावर खरंच विश्वास असेल, तर स्वर्गाच्या दारात जात-धर्माचे सरकारी प्रमाणपत्र मागणार नाहीत, याबाबत तरी तुम्हाला नक्कीच खात्री असायला हवी. धर्म ही पूर्णपणे वैयक्तिक बाब आहे, हे पुरोगामी, विवेकी आस्तिकानेच दाखवून द्यायला हवे.

पुरोगामी लेखक, विचारवंतही, 'दुसरे कोणीतरी परिस्थितीस जबाबदार आहेत' अशी विधाने करताना दिसत आहेत. एखादी टेस्टट्यूब बेबी अवतार घेऊन भारत जात-धर्ममुक्त करेल अशी आशा करत आहेत. कोणीही समाजबदलासाठी एक सामान्य माणूस म्हणून वाचकाने काय-काय करणे शक्य आहे, हेही स्पष्टपणे सांगत नाही. राजकारणी हे समाजातील वाऱ्याप्रमाणे दिशा बदलणारे असतात. त्यांच्याकडून दिशादर्शनाची अपेक्षा करणे कितपत योग्य आहे. राजकारण्यांवर टीका करून वाचकांची फक्त करमणूक होते व लेखकाचे कौतुक. यात आपलीही काही भूमिका आहे असे कोणालाच वाटताना दिसत नाही. वाचकाला द्यायच्या कडू गोळीला गोड मुलामा म्हणून राजकारण्यांवरील टीका ठीक आहे पण त्याचे प्रमाण तेवढेच हवे.

माफ करा...!

मी कडू गोळी तशीच दिली. गोड मुलामा न देता, हे खंरतर आधीच सांगायला हवे होते. पण गोड गोळ्या देणारे तुम्हाला बरेच भेटतील. तुम्ही त्या खालही आणि हा कडवटपणा विसरूनही जाल.

milind.sontakke@gmail.com

■■

# माझी विचारसरणी

*प्रा. य. ना. वालावलकर*

जीवनशैली विवेक

विविध विषयांवर माझे विचार काय आहेत, माझी मते कोणती आहेत ते या लेखात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. विविध विषय म्हटले तरी ते देव-धर्म-श्रद्धा-विवेकवाद यांच्याशी संबंधित आहेत. तसेच लेखातील विषय काही एका विशिष्ट क्रमाने मांडले आहेत असे नाही. जसे सुचेल तसे लिहिले आहे. मला जे मन:पूर्वक वाटते तेच लिहिले आहे.

१. हे विश्व कशातून निर्माण झाले ? कसे उत्पन्न झाले? कोणी केले? प्रारंभी काय होते? हे विश्व शून्यातून निर्माण झाले का? याविषयी मला निश्चित असे काही ठाऊक नाही. अजून मतमतांतरे आहेत असे दिसते. महाविस्फोट, बिगबँग, हिग्सबोसान् कण यांसंबंधी प्रसंगपरत्वे वाचतो. पण ते मला आकळते (समजते) असे नाही. हे विश्व एवढे अफाट, एवढे अमर्याद आहे की त्याच्या तुलनेत आपला पृथ्वी ग्रह अगदीच नगण्य आहे. हे मला समजते. माझा संबंध या पृथ्वी ग्रहाशी आहे. म्हणून विश्वाच्या उत्पतीविषयी मी अधिक विचार करीत नाही. अवकाश, वस्तुमान, काळ (स्पेस-मास-टाईम) या गोष्टी अनादि कालापासून अस्तित्वात आहेत , निसर्गनियमही अनादि कालापासून आहेत असे मी मानतो. या घटकांवर निसर्गनियमांनुसार विविध प्रक्रिया होऊन तारे, ग्रहमाला, आकाशगंगा, नेब्यूला, क्वासार, कृष्णविवरे, इत्यादि सर्व काही निर्माण झाले असे मी मानतो. माझे हे अज्ञान असेल. माझ्या आकलनक्षमतेची ही मर्यादा आहे.

मात्र हे विश्व कोण्या एका अलौकिक ईश्वराने निर्माण केलेले नाही. ते निसर्गनियमांनुसार उद्भवले असे माझे ठाम मत आहे. याविषयी अधिक वाचन, मनन, चिंतन करण्याची माझी क्षमता नाही. तसे करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही. त्यातून काही उपयुक्त घडेल असेही वाटत नाही. माझे आयुष्य काही वर्षांचे आहे. माझे विश्व लहान आहे.

२. या अमर्याद विश्वाविषयी अधिक सखोल विचार करावा असे मला वाटत नाही. असे म्हटले असले तरी या विश्वाविषयी शक्य होईल तेवढे सत्यज्ञान आपण मिळवायला हवे असे मला वाटते. आपली ग्रहमाला(प्लॅनेटरि सिस्टिम) कशी अस्तित्वात आली याचे विश्वासार्ह आणि सर्वमान्य ज्ञान विज्ञानाला आहे. साधारणपणे ४६० कोटी वर्षांपूर्वी एक अजस्र तारा सूर्या जवळून गेला. त्याच्या गुरुत्वाकर्षणामुळे सूर्यावर मोठी भरती आली. (सूर्य वायुरूप आहे.) ती फुटून लहान-मोठे पुंजके तयात झाले. ते सूर्याच्या गुरुत्वाकर्षणक्षेत्राच्या बाहेर गेले नाहीत. सूर्याच्या केंद्रगामी गुरुत्वाकर्षण बलामुळे (सेंट्रिपेटल फोर्स) ते सूर्याभोवती फिरत राहिले. ही झाली आपली ग्रहमाला. म्हणजे पृथ्वीचे वय ४६० कोटी वर्षे आहे.

कालांतराने पृथ्वी थंड झाली. पाणी पृथ्वीच्या पोटातून वर येऊन समुद्र निर्माण झाले. समुद्राच्या पाण्यातील विविध रासायनिक द्रव्यांचे क्रमपर्यायी संयोग (परम्युटेशन्स-कॉंबिनेशन्स) अविरत घडत राहिले. या सततच्या प्रकि येतून सुमारे साठ कोटी वर्षांनी सजीव पेशी यदृच्छया निर्माण झाल्या. अगदी प्रथमिक स्वरूपाचे जीव तयार झाले. नंतर स्वैर गुणबदल (रँडम म्युटेशन) आणि निकष लावून झालेली नैसर्गिक निवड (नॉन रँडम नॅचरल सिलेक्शन) या तत्त्वांच्या आधारे उत्क्रांती होत होत या पृथ्वीवरील वैविध्यपूर्ण सजीवसृष्टी निर्माण झाली. माणूसही त्याच प्रक्रियेतून उत्क्रांत झाला.

३. या पृथ्वी ग'हावरील मानव प्रजातीत माझा जन्म झाला हे माझे महद्भाग्य मानतो. मला लाभलेले हे एकमेव जीवन आहे - पहिले आणि शेवटचे. माझा गतजन्म नव्हता. पुनर्जन्मही असणार नाही. कुणाचाच नसतो. पुनर्जन्म ही भ्रामक कल्पना आहे. जातस्य हि ध्रुवो मृत्यु: । हे गीतावचन सत्य आहे. मृत्यू अटळ आहे. माझा मृत्यू झाल्यावर माझे जीवन संपुष्टात येणार.

४. मी कुटुंबात राहातो. समाजात राहातो. म्हणून जी काही माझी कौटुंबिक कर्तव्ये आहेत, सामाजिक कर्तव्ये आहेत ती सर्व मी यथाशक्ती, यथामती आनंदाने आणि निष्ठेने पार पाडणार. कर्तव्य म्हणजे अवश्य करायला हवे असे स्वकर्म. ज्ञानेश्वरीतील तया सर्वात्मका ईश्वरा । स्वकर्मकुसुमांची वीरा । पूजा केली होय अपारा तोषालागी। हे वचन मी मानतो.

५. मरण अटळ आहे. मृत्युनंतर पुन्हा जीवन नाही. म्हणून या सृष्टिविषयीचे आणि विश्वासंबंधीचे शक्य होईल तेवढे सत्यज्ञान मिळविण्याचा मी आमरण प्रयत्न करणार. जीवनाचा आनंद उपभोगणार. कुटुंबाचे, समाजाचे आणि पुढील पिढ्यांचे जीवन अधिक सुखकर, अधिक सुरक्षित होईल यासाठी शक्य होईल ते काम करणार. समाजातील अज्ञान आणि माणसांचे दु:ख दूर होण्यासाठी यथाशक्ती प्रयत्न करणार.

६. भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत. या साऱ्याच्या प्रगतीत देशाची प्रगती गुंफलेली आहे. हे मला पटते. म्हणून मी ते मनापासून मानतो. माझ्या देशबांधवांनी वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणे त्यांच्या हिताचे आहे. म्हणून ते समाजाच्या आणि अंतत: देशाच्या हिताचे आहे असे मला विचारान्तीं वाटते. हे प्रामाणिक मत माझ्या देशबांधवांना वैधमार्गांनी परोपरीने सांगण्याचे मला घटनादत्त स्वातंत्र्य आहे. किंबहुना वैज्ञानिक दृष्टिकोन अंगीकारणे आणि त्याचा प्रसार करणे हे, भारतीय संविधानानुसार आपणा सर्वांचे कर्तव्य आहे.

७. या लेखात मी ज्या अंधश्रद्धा सांगितल्या आहेत, ज्यांना भंपक शास्त्रे (स्यूडो सायन्सेस ) म्हटले आहे, त्यांतील कोणत्याही गोष्टीचा त्याग न करता ती खरी मानून चालणार्या श्रद्धाळूंना मी दोष देत नाही. त्यांच्याविषयी माझ्यामनात किंचितही राग नाही. पण त्यांनी स्वबुद्धीने विचार करावा. श्रद्धेची चिकित्सा करावी. असे माझे मत आहे. समाजात काही धूर्त, लबाड माणसे असतात. सर्वकाळी असतात. श्रद्धाळूंना फसवून लुबाडणे, त्यांचे आर्थिक शोषण करणे हाच त्यांच्या उपजीविकेचा धंदा असतो. प्रसारमाध्यमांतून जाहिराती करून ते सतत अज्ञान पसरवीत असतात. तसेच भाडोत्री प्रचारक नेमून आपल्या धंद्याचा प्रचार करतात. एखाद्या समस्येमुळे अपरिहार्यपणे अगतिक झालेले श्रद्धाळू या धूर्तांच्या प्रचाराला बळी पडतात. आधीच अगतिक झालेल्या आणि श्रद्धेने लिप्त असलेल्या लोकांना आपली आर्थिक फसवणूक होत आहे हे कळतही नाही. माझा विरोध आहे तो या कावेबाज धूर्तांना. राग येतो तो त्यांचा. ते भोळ्या श्रद्धाळूंना अज्ञानात ठेवून निर्दयपणे फसवत असतात. वर शहाजोगपणाचा आव आणतात.

८. जगनिर्माता, जगन्नियंता, पूजा-अर्चा-प्रार्थना यांनी संतुष्ट होऊन भक्तांवर कृपा करणारा असा कोणी अलौकिक ईश्वर अस्तित्वात नाही. कितीही आर्ततेने धावा केला तरी देव धावून येत नाही. देव भक्ताघरीं धावला हे केवळ काल्पनिक पुराणकथांत असते. व्यवहारात नसते. माणसाने वास्तववादी असावे. कुठल्याही भ्रमात राहू नये.

९. या विश्वात एक अलौकिक, अद्भुत शक्ती आहे. ती विश्वाचे संचलन करते. विश्वातील यच्चयावत् सर्व घटना ती शक्ती घडवते. हे पूर्णतया तथ्यहीन आहे. अशी अलौकिक शक्ती कुठेही अस्तित्वात नाही. विश्वातील सर्व घटना निसर्गनियमांनुसार घडतात.

१०. जगात कुणाकडे कसलीही दैवी शक्ती नसते. आपल्या कृपेने, प्रसादाने, अनुग्रहाने, आशीर्वादाने कुणाचे भले करण्याचे सामर्थ्य कुणाजवळ नसते. मग तो कितीही मोठा, सुप्रसिद्ध असो. तसे सामर्थ्य असल्याचा दावा करणारे गुरु-बाबा-स्वामी-बापू हे सर्व लबाड, ढोंगी, ठकसेन असतात अथवा मनोविकृत भ्रमसेन असतात.

११. आत्मा, पुनर्जन्म, परमात्मा, मोक्ष या सर्व भ्रामक संकल्पना आहेत. त्या उपनिषदांत आहेत, गीतेत प्रत्यक्ष भगवंतांच्या मुखी आहेत, शांकरभाष्यात आहेत, संतसाहित्यात आहेत, तरी त्या सत्य मानता येत नाहीत. त्या प्रत्यक्ष प्रमाणाने सिद्ध होत नाहीत. लोकप्रसिद्ध अनुमानप्रमाणाने सिद्ध होत नाहीत. तार्किक युक्तिवादाने तसेच मानवाच्या अधिकृत ज्ञानसंग्रहातील तत्त्वांच्या आधारे वरील संकल्पनांची सत्यता प्रस्थापित करता येत नाही. त्या संकल्पना केवळ श्रद्धेने खऱ्या मानायच्या. श्रद्धेला तर विज्ञानात तसेच तर्कशास्त्रात मुळीच स्थान नाही. म्हणून आत्मा, परमात्मा इ. संकल्पना मी खऱ्या मानीत नाही. पूर्वापार, पिढ्यानुपिढ्या चालत आलेल्या या संकल्पनांची कोणतीही चिकित्सा न करता व्यासमहर्षी, आद्यशंकराचार्य, ज्ञानेश्वर, अन्य साधुसंत यांनी त्या शब्दप्रामाण्याच्या आधारे खऱ्या मानल्या. पण आधुनिक विज्ञानाच्या आधारे चिकित्सा केल्यास त्या भ्रामक ठरतात.

१२. स्वर्ग, नंदनवन, अप्सरा, अमृत, नरक-कुंभिपाक-रौरव-यमयातना या सर्वच्या सर्व गोष्टी केवळ काल्पनिक आहेत. प्रत्यक्ष अस्तित्वात नाहीत, हे उघड आहे.

१३. संचित, क्रियमाण, प्रारब्ध, कर्मविपाक, या तथ्यहीन कल्पना आहेत. नियती, ललाटलेख, ब्रह्मलिखित, या सर्व गोष्टी निरर्थक आहेत.

१४. कोणतेही धार्मिकविधी (पूजा-अर्चा-व्रतवैकल्ये-होम-हवन इ.) करून कोणताही हेतू साध्य होत नाही. (जो विधी करायचा असे योजिले असेल तो विधी पार पडतो एव्हढेच.) केवळ मानसिक समाधान लाभू शकते. अशा कर्मकांडांच्या वेळी जे संस्कृत भाषेतील मंत्र म्हणतात त्या मंत्रांत कोणतेही सामर्थ्य नसते.

१५. गुरुमंत्र, नम: शिवाय ।, गं गणपतये नम:। नमो भगवते वासुदेवाय ।, मृत्युंजय महामंत्र, गायत्री मंत्र, असल्या कुठल्याही मंत्रात कसलेही सामर्थ्य नसते. हे मंत्र आणि ओले मंतर कोले मंतर, फू: मंतर छू: मंतर यांत मूलत: काही भेद नाही. सगळे सारखेच निरुपयोगी !

१६. पुराणात शाप-उच्छाप, वर-वरदान, देण्याच्या अनेक कथा आहेत. त्या सर्व काल्पनिक आहेत. एखाद्याला शाप देऊन त्याचे काही वाईट करण्याचे सामर्थ्य कुणाजवळही नसते. पूर्वीसुद्धा कुणाजवळ नव्हते. तथाकथित सिद्धयोगी, तपस्वी, ऋषी, अशा कोणीही कुणाला शाप दिला तरी त्या शापाचा कोणताही परिणाम शापित व्यक्तीवर होऊ शकत नाही. पूर्वी कधीही झालेला नाही. भविष्यात कधी होणार नाही. मात्र, मला त्या साधूने शाप दिला आहे. आता माझे काहीतरी वाईट होणार असा धसका त्या शापित व्यक्तीने घेतला तर त्या भीतीने मानसिक परिणाम होईल. त्याचे पर्यवसान काही शारीरिक आजारात होऊ शकेल. कुण्या तापट साधूने रागीट मुद्रा धारण करून, डोळे खदिरांगारांसारखे लालबुंद करून, तुला भस्मसात करतो. अशी शापवाणी उच्चारली तरी वाळलेल्या गवताची काडीसुद्धा पेट घेणार नाही.

तसेच आपल्या भक्तावर संतुष्ट होऊन कुण्या साधूने, तथाकथित योग्याने, त्या भक्ताला वर अथवा आशीर्वाद दिला तरी त्यामुळे त्या भक्ताचे काही कल्याण होणार नाही. काहीसुद्धा भले होऊ शकत नाही. (केवळ मानीव मानसिक समाधान मिळेल तेवढेच.)

शाप अथवा वर यांमुळे काही प्रत्यक्ष घडून येणे हे निसर्गनियमाविरुद्ध आहे. तसे करण्याचे सामर्थ्य कुणालाही प्राप्त होत नाही. या संबंधीच्या सर्व पौराणिक कथा बाष्कळ आहेत.

१७. कितीही योगसाधना केली, ध्यान-धारणा करून समाधी लावली, तरी अष्टसिद्धींतील एकही सिद्धी कुणालाही प्राप्त होणे शक्य नाही. अशी सिद्धी मिळणे हे निसर्गनियमाचे उल्लंघन आहे. ते कोणीही करू शकत नाही.

१८. सर्व तथाकथित चमत्कार हे हातचलाखीचे प्रयोग असतात. पदार्थांच्या रासायनिक गुणधर्मांचा उपयोग करून असे प्रयोग दखविता येतात की जे लोकांना चमत्कारसदृश वाटतील. विविध रासायनिक अभिक्रियांविषयी जनसामान्यांना काही ठाऊक नसते.

१९. आकाशातील ग्रह आणि राशी (तारकापुंज) माणसाच्या जीवनावर काही परिणाम होतो याला यत्किंचितही पुरावा नाही. असा कोणताच परिणाम होत नाही असे सर्व वैज्ञानिक नि:संदिग्धपणे सांगतात.म्हणून फलज्योतिष, त्यांतील ग्रह योग, युती-प्रतियुतीचे परिणाम, शनीची साडेसाती, इ. सर्व संकल्पना निरर्थक आहेत. थोडक्यात म्हणजे फलज्योतिष हे एक भंपक विज्ञान (स्यूडो सायन्स) आहे, हे वारंवार सिद्ध झाले आहे. फलज्योतिषाचा अभ्यास इथेच संपतो. फलज्योतिष विषयावरील पुस्तके वाचणे, अभ्यास करणे हा केवळ कालापव्यय आहे.

२०. अंगठीत विशिष्ट रंगाचा खडा घातला की इथून कित्येक कोटी कि.मि. दूर असलेल्या ग्रहांची अशुभफळे टळतात ही समजूत अडाणीपणाची आहे. मुळात कुठल्याही ग्रहाचे कसलेच फळ नसते. स्वबुद्धीने थोडा जरी विचार केला तरी हे सहज समजते. तसेच बोटांत अंगठ्या, किंबहुना अंगावर कसले अलंकार घालणे हे मला ओंगळवाणेपणाचे वाटते.

२१. कोणताही दिवस, कोणतीही गोष्ट, शुभ-अशुभ, पवित्र-अपवित्र, पुण्यदायक-पापकारक नसते. ती चांगली -वाईट, योग्य-अयोग्य, हितकारक-अहितकारक असू शकते.

२२. वास्तु (दिशाभूल) शास्त्र, प्राणिक हीलिंग (प्राणशक्तिउपचार), ब्रह्मविद्या, ओंकारगुंजन, अग्निहोत्र इ. सर्व भंपक (स्यूडो) शास्त्रे आहेत. त्यांतून हितकारक असे काहीही साध्य होत नाही.मात्र असल्या भंपक शास्त्रांच्या आधारे श्रद्धाळू गिर्हाइकांना फसवून काही लबाड माणसे भरपूर कमाई करतात.

२३. सुरक्षाकवचे, श्रीयंत्रे, रुद्राक्ष, पिरॅमिडस्, अश्या सर्व वस्तु पूर्णतया निरुपयोगी असतात. त्या घरात आणून ठेवल्या असता आपल्या समस्या दूर होतील असे मानणे असमंजसपणाचे आहे.

२४. अंत्यसंस्कारांच्या संदर्भात हिंदुधर्मातील पुरोहितांनी जी कर्मकांडे रूढ केली ती सर्व त्यांच्या कमाईसाठी, अधिकाधिक लाभासाठी आहेत. हे अगदी स्पष्ट दिसते. अन्यथा पिंडदान, अकरावे, बारावे, तेरावे, मासिक श्राद्ध, वार्षिक श्राद्ध, सर्वपित्री अमावास्या, असले प्रकार का आले असते? या संदर्भात वैज्ञानिक सत्य काय आहे? मृत्युनंतर जीवन पूर्णतया संपते. अमर आत्मा, अतृप्त आत्मा, पुनर्जन्म, मोक्ष या सर्व कल्पना भ्रामक आहेत. विद्युत-दाहिनीत दहन करावे. (देहदान केल्यास उत्तमच). नंतर कोणतेही कर्मकांड करू नये. मोठ्या प्रमाणात होणारा अनावश्यक खर्च वाचेल. आपल्या श्रमाचा, घामाचा, कष्टाचा पैसा व्यर्थ वेचू नये. या कर्मकांडांमुळे आजवर अब्जावधी रुपयांची लूट झाली. कित्येकजण कर्जबाजारी झाले. हे पैसे नुसते वाया जातात. हे विधी केले नाहीत तर कुणाचे काहीही वाईट होत नाही. हे स्वानुभवाने सांगतो. समाज काय म्हणेल याची चिंता नको. अनेकजण तुमचे अनुकरण करतील.

२५. निसर्ग हा पूर्णतया उदासीन आहे. भूकंप, वणवे, महापूर, वादळे, अशा घटना निसर्गनियमांनुसार घडतात. त्यामागे कुणाचा कसलाही हेतू नसतो. कोणतीही नैसर्गिक घटना माणसांच्या, पशुपक्ष्यांच्या, अन्य प्राण्यांच्या, वनस्पतिसृष्टीच्या हितासाठी अथवा हानीसाठी घडत नाही. पाऊस पडतो तो प्राणिमात्रांना, वृक्षवेलींना पाणी मिळावे म्हणून नव्हे. तो निसर्गनियमानुसार पडतो. त्यामागे कार्य-कारणभाव असतो तो केवळ निसर्गनियमांचा. अन्य कशाचाही नाही.

ynwala@gmail.com

■■

## शैक्षणिक गुणवत्ता मानसिकतेत रुजायला हवी !

*सुरेन्द्र दिघे*

शिक्षण सामाजिक समस्या

दोन हजार साली 'डकार' येथे शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या संदर्भात झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत 'गुणवत्ता' हा शब्द शिक्षणाच्या संदर्भात प्रथम वापरला गेला. शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाबरोबरच त्यातील गुणवत्ता वाढवणे याचा उल्लेख परिषदेच्या शेवटी जाहीर केलेल्या निवेदनात होता. जे शिक्षण मुलांच्या अध्ययनविषयक गरजा भागवते आणि त्यांचे जीवन समृद्ध बनवते, तेच गुणवत्तापूर्ण शिक्षण अशी व्याख्या त्यावेळेच्या अहवालात केली होती.

'डकार' परिषदेच्या नंतर भारतीय केंद्र सरकारने प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ प्रा. यशपाल यांच्या अध्यक्षतेखाली भारतातील शिक्षणतज्ज्ञांची कॅबेट (C-BET) समिति बनवली होती. या समितीची जबाबदारी नवीन शैक्षणिक धोरण, कायदा व आराखडा यांचा दस्तऐवज करणे ही होती. २००२ ते २००७ या पाच वर्षांत या समितीने बनविलेल्या मसुद्यात अनेक बदल केले गेले. यातील प्रमुख बदल म्हणजे नवीन शिक्षण कायद्याच्या मसुद्यात बालकांना शिक्षणाचा कायदेशीर हक्क देताना यातील गुणवत्ता शब्द गाळला गेला. या करामतीमुळे शासनाने गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देण्याची कायदेशीर जबाबदारी झटकून टाकली होती. मला वाटते इथेच गुणवत्तेच्या आणि शिक्षणाच्या फारकतीला सुरुवात झाली.

तथापि २००५ साली मा. यशपाल यांच्या समितीने राष्ट्रीय अभ्यासक्रमाचा आराखडा प्रसिद्ध केला. यामध्ये मात्र शिक्षण गुणवत्तापूर्ण आणि ज्ञानरचनावादी असावे यावर भर दिला होता. याच आराखड्याच्या आधारावर महाराष्ट्र-शासनाच्या शिक्षण- विभागाने २०१० साली राज्य शैक्षणिक आराखडा मसुदा प्रसिद्ध केला. त्यामध्ये राष्ट्रीय आराखड्यातील बहुतांशी विचारांचा आणि धोरणांचा पुनरुच्चार केला आहे. थोडक्यात शिक्षणातली गुणवत्ता कशी वाढावी, यावर राष्ट्रीय आणि राज्य-आराखड्यात सविस्तर निवेदन व मार्गदर्शन केलेले आहे. 'तुझे आहे तुजपाशी परी तू जागा चुकलासी' अशी अवस्था राज्य शालेय शिक्षणाची झाली आहे, असे म्हणावेसे वाटते.

संपूर्ण आराखडा हाताशी असूनसुद्धा शालेय–शिक्षणाच्या गुणवत्तेची वाढ न होता ती दिवसेंदिवस ढासळत आहे याची प्रचीती आपल्या सर्वांना येत आहे. त्याची कारणे अनेक आहेत, परंतु त्यातील प्रमुख कारणे म्हणजे शासनामध्ये

१) दूरदृष्टीचा अभाव,

२) निर्णयक्षमतेची वानवा,

३) अपुरी इच्छाशक्ती,

४) अकार्यक्षमता आणि,

५) सर्वच पातळीवरील भ्रष्टाचार.

नवीन सरकारने आपल्या कृतीत या वरील सर्व बाबतित शिस्त, संवेदनशीलता व प्रामाणिकपणा दाखविला तर राज्यातली शैक्षणिक गुणवत्ता वाढण्यास वेळ लागणार नाही.

शासनावर दोषारोपाचे बोट दाखवताना उरलेली चार बोटे ही शिक्षक, संस्थाचालक, पालक व समाज यांच्याकडेही रोखलेली आहेत, हे पण लक्षात ठेवणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यात सर्वांत महत्त्वाचा दुवा शिक्षक हाच आहे. शिक्षक गुणवत्ता वाढवू शकतो आणि ढासळवू पण शकतो. संज्ञारचनावादात शिक्षकांची भूमिका केवळ पारंपरिक शिकवण्याची राहिली नसून त्याला मार्गदर्शकाचीपण भूमिका बजावावी लागत आहे आणि इथेच शिक्षक कमी पडत आहेत. मार्गदर्शकाची भूमिका शिक्षकांच्या पचनी अजूनही पडलेली नाही. राज्य–शालेय–विभागाकडून शिक्षकांची उदंड मार्गदर्शन शिबिरे होत आहेत. परंतु त्याचा फारसा उपयोग होताना दिसत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे ही शिबिरे प्रामुख्याने सरकारी खाक्यात घेतली जातात. यामध्ये शिक्षकांना भावनाशीलता आणि संवेदनशीलता यांचे प्रशिक्षण दिले जात नाही. आज खरी गरज आहे ती शिक्षकांनी परत एकदा आपल्या विद्यार्थ्यांशी भावनात्मक आणि संवादात्मक नाते जोडून व त्यांच्याविषयी संवेदनशील राहण्याची. सुदैवाने आज महाराष्ट्रात असे अनेक शिक्षक आहेत. राष्ट्रीय बाल विज्ञान परिषद आणि आता नुकत्याच आयोजित केलेल्या गणित –यात्रेच्या निमित्ताने जिज्ञासा ट्रस्ट ठाणे महाराष्ट्रातील अशा हजारो शिक्षकांच्या संपर्कात आहे. या शिक्षकांचे एक मोठे नेटवर्क निर्माण होऊन त्यातून गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा ध्यास घेतलेल्या शिक्षकांची चळवळ निर्माण झाली तर महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्राचे चित्र निश्चितच लवकर बदलेल. जिज्ञासा ट्रस्ट त्याबाबतीत प्रयत्न करीत आहे.

'अच्छे दिन आनेवाले हैं' या नव्या उमेदीच्या काळात शिक्षणसंस्था चालकांनी विशेषतः मराठी शाळाचालकांनी आपली मानसिकता बदलणे आवश्यक आहे. आता मराठी शाळा हा भावनात्मक अथवा अस्मितेचा प्रश्न राहिलेला नाही. आजचा काळ गुणवत्तेचा आहे हे ओळखून मराठी शाळांच्या अस्तित्वासाठी संस्थाचालकांनी गुणवत्तेचा आग्रह धरला पाहिजे. नवीन नवीन उपक्रमांचा शोध घेऊन विद्यार्थ्यांच्यातील जीवनकौशल्यांची वाढ कशी करता येईल याचा सतत विचार व कृती शाळाचालकांनी करणे गरजेचे आहे. यासाठी अर्थातच आर्थिक पाठबळाची जरुरी या संस्थाचालकांना आहे यात शंका नाही. हे पाठबळ शासनाने आणि समाजाने देणे आवश्यक आहे.

गुणवत्तेच्या संदर्भात पालकांची भूमिका तेवढीच महत्त्वाची आहे. गुणवत्ता ही व्यक्तिनिहाय व कला कौशल्यनिहाय असते. आपल्या पाल्याने सर्वच विषयांत आणि सर्व प्रकारे गुणवान व्हावे, ही अपेक्षा पालकांनी ठेवणे चुकीचे आहे. प्रत्येक मुलाची विविध जीवनकौशल्य–संदर्भातील गती, मती व आवड वेगवेगळीच असू शकते, हे पालकांनी समजून घेणे आवश्यक आहे. आनंददायी शिक्षण या संकल्पनेतील प्रमुख अडथळा पालकच असतात.

हे सर्व विवेचन करताना शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याची सर्वांत मोठी जबाबदारी समाजावर आहे हे स्पष्ट करावेसे वाटते. मुळात आपला समाज गुणवत्तेविषयी आग्रही आहे का? हाच प्रश्न उद्भवतो. 'चलता है, चलने दो' हे आपल्या भारतीय समाजाचे घोषवाक्य आहे. दैनंदिन जीवनात वावरताना आपण आपल्या व्यक्तिगत जीवनात गुणवत्तापूर्ण जगण्यासाठी आग्रही नसतो हे कटू सत्य आहे. शेवटी, एकंदरीत गुणवत्ता ही देशाच्या मानसिकतेत रुजावी लागते. जपानसारख्या देशाने ते सिद्ध करून दाखविले आहे.

'लोकसत्ता'च्या सौजन्याने

surendradighe@yahoo.com

# भारतातील रॅशनॅलिस्ट चळवळ

*प्रभाकर नानावटी*

पुस्तक परीक्षण श्रद्धा-अंधश्रद्धा चळवळ विवेकवाद

एका अभ्यासू रॅशनॅलिस्टच्या मते भारत देश हा फक्त धर्म, श्रद्धा, अंधश्रद्धा, रूढी, परंपरा यांचाच देश नसून निरीश्वरवाद, विवेकवाद, मानवतावाद, चिकित्सक वृत्ती, अज्ञेयवाद यांचेही अंश कुठे ना कुठे तरी या देशात प्राचीन काळापासून सापडतात. जेव्हा हे मत आपण धसास लावण्याचा प्रयत्न करतो तेव्हा यातील खरेपणाविषयी संशय वाटू लागतो. कारण आपल्या आवती भोवती धर्माच्या अतिरेकामुळे विवेक, मानवता यांना पायदळी तुडवलेली उदाहरणे मोठ्या प्रमाणात सापडतात. परंतु डॉ. जॉन (जोहान्नेस) क्रॅक या एडिनबरो विद्यापीठातील प्राध्यापकाला मात्र आपल्या देशातील हा वेगळेपणा चटकन लक्षात येतो. त्यानी यासंबंधी एक प्रबंधच सादर केला असून त्याच प्रबंधाची पुस्तकी आवृत्ती *Disenchanting India* या नावाने ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने प्रकाशित केली आहे.

त्यांच्या या प्रबंधात प्रामुख्याने भारताच्या रॅशनॅलिस्ट परंपरेचा इतिहास, व आता त्याचे समाजातील स्थान यांवर ऊहापोह केला आहे. त्यासाठी लेखकाने देशभर विखुरलेल्या अनेक रॅशनॅलिस्ट संघटनांना प्रत्यक्ष भेट देऊन माहिती गोळा केली आहे. संघटनेचे उद्दिष्ट, त्यांच्या कार्याचे स्वरूप, त्याचे समाजावर होत असलेले परिणाम इत्यादीवर दृष्टिक्षेप टाकण्याचा प्रयत्न केला आहे. एक संशोधक म्हणून त्यानी घेतलेले श्रम व माहिती गोळा करण्यासाठी घेतलेली चिकाटी अत्यंत प्रशंसनीय ठरेल.

खरे पाहता लेखकाला रॅशनॅलिझमच्या प्रत्यक्ष व्यवहारात होत असलेल्या उपयोगासंबंधी उत्सुकता होती. या रॅशनॅलिस्ट संघटना परंपरावादी समाजाचा सामना कशा प्रकारे करतात, रॅशनॅलिस्ट तत्त्वज्ञान त्यांच्या गळी कशा प्रकारे उतरवतात, त्यामुळे उद्भवलेल्या कठिण प्रसंगाचा सामना कसे करतात, इत्यादीसंबंधी माहिती मिळवण्यात त्याला रुची होती. परंतु आपल्यातील बहुतेक संघटना कागदी घोडे नाचवण्याव्यतिरिक्त फार काही करत नाहीत. अनेक संघटना व्यक्तिकेंद्रित असल्यामुळे कार्यकर्त्यांची वानवा असते. आठवड्यातून वा महिन्यातून एखादी बैठक, काही निषेध पत्रके, एखादे मुद्रित नियतकालिक वा संस्थळावर लांबलचक अशी दुर्बोध माहिती यापुरतेच त्यांचे कार्य सीमित असते. त्यामुळे लेखकाला महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या (अंनिसच्या) कार्यावर लक्ष केंद्रित करावेसे वाटले. अंनिसचे उद्दिष्ट, त्याची कार्य पद्धती, धोरणे, त्यांच्या कार्यकर्त्यांची नैतिक बैठक, लेखकाला आवडल्यामुळे त्याच्या प्रबंधाचा मोठा हिस्सा अंनिसच्या संबंधी आहे. यासाठी लेखक अंनिसच्या कार्यकर्त्यांबरोबर राहून, खेड्यापाड्यांत हिंडून, त्याच्या वरिष्ठ व इतर कार्यकर्त्यांशी चर्चा करून अंनिसला समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे एका अर्थाने हा प्रबंध अंनिसच्या वाटचालीचा लेखाजोखा आहे म्हणण्यास भरपूर वाव आहे.

या पुस्तकात केवळ अंनिससंबंधीच माहिती नसून भारतातील बुद्धिप्रामाण्यवादी, इहवादी, निरीश्वरवादी, मानवतावादी, अज्ञेयवादी व मुक्तविचार करणाऱ्या या क्षेत्रातील बहुतेक विचारवंतांच्या व त्यांच्या संघटनाबद्दल विमर्शात्मकपणे केलेली माहिती आहे. आताची रॅशनॅलिस्ट चळवळ मुख्यत्वेकरून जनमनसातील अंधश्रद्धांना आव्हान देत आहे. त्याचबरोबर अलौकिक शक्तीचा दावा करणाऱ्या व अविवेकी विचारांचा प्रचार - प्रसार करणाऱ्या बुवा - बाबांच्यावर आगपाखड करणारी आहे. या प्रकारच्या चमत्कार वा अतींद्रिय शक्तीचा दावा करणाऱ्यांच्या प्रभावातून जनसामान्यांना मुक्त करून त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्याची, चिकित्सक विचार करण्याची, कार्यकारण भाव समजून घेण्याची व भावनेच्या आहारी न जाता कृती करण्याची गरज कशी आहे यावर भर दिला जात आहे. आध्यात्मिकतेच्या मृगजळाच्या मागे न धावता ऐहिक सुख, सुख समाधानी जीवन पद्धती व मानवतावादी दृष्टिकोन जनमानसात रुजविण्याचे प्रयत्न आपापल्या कुवतीनुसार करत आहेत, हे लेखकाच्या लक्षात आले. परंतु या गोष्टीतसुद्धा नवीन काही नसून आपल्या देशात चार्वाक, लोकायत, संत कबीर, राजा राममोहन राय, महात्मा फुले, पंडिता रमाबाई, महर्षी कर्वे, गोरा, आगरकर, अब्राहम कोवूर, इत्यादींनी या गोष्टी यापूर्वीच सांगितल्या आहेत.

या पुस्तकाच्या पहिल्या भागात त्रोटकपणे उपलब्ध असलेल्या लिखित साहित्यातून भेटणाऱ्या भारतीय रॅशनॅलिस्ट्सच्या बद्दलची माहिती दिली आहे. या माहितीवरून लेखक आपल्यातील अंधश्रद्धांचे मूळ आपल्यातील धार्मिकतेत आहे, या निष्कर्षाप्रत पोहोचतो. भारतीयांच्या संदर्भातील रॅशनॅलिटी, रॅशनॅलिझम, व रॅशनलायजेशन या संकल्पना पाश्चात्त्य तत्त्वज्ञांना अभिप्रेत असलेल्या संकल्पनांपेक्षा फार वेगळ्या आहेत हे जाणवते. भारतीय संदर्भात काही वेळा रॅशनॅलिझम म्हणजे न्याय व समता, काही वेळा अहिंसा व सत्यान्वेषण, काही वेळा विचारप्रक्रियेतून दृढ झालेली जीवनपद्धती या अर्थानेसुद्धा वापरला जातो. त्यामुळेच कदाचित भारतीय रॅशनॅलिस्ट्स स्वतःला बुद्धिवादी, युक्तिवादी, तर्कवादी, विवेकवादी, रॅडिकल मानवतावादी इत्यादी नावाने ओळखले जात असावेत. ही नावे त्या त्या व्यक्तीच्या धर्माबद्दलच्या व परमेश्वराचे अस्तित्व मानणे वा न मानणे या आकलनातून आलेले असावेत. त्यामुळे मानवतावाद, विवेकवाद, निरीश्वरवाद, समाधानी आयुष्य जगण्यासाठी विचारपूर्वक अनुसरलेला मार्ग, वैज्ञानिक दृष्टिकोन, विज्ञान –तंत्रज्ञानाचा पुरस्कार, पर्यावरणवाद, स्त्रीवाद इत्यादी गोष्टीसुद्धा रॅशनॅलिझमशी जोडलेल्या असतात. रॅशनॅलिझमच्या तात्त्विक चर्चेसाठी लेखक मॅक्स वेबर व चार्ल्स टेलर यांचा आधार घेतो.

खरे पाहता हे पुस्तक म्हणजे त्याच्या संशोधनावरील प्रबंध आहे. म्हणूनच लेखक स्वतःच्या संशोधनाची वर्गवारी multisited ethnography या सदरात करतो. एखाद्या चळवळीचा एथ्नोग्राफिक म्हणजे वांशिक – सांस्कृतिक गट म्हणून अभ्यास करणे आणि अँथ्रोपॉलॉजिकल म्हणजे मानववंशातील शारीरिक, सांस्कृतिक आणि आचरणात्मक इत्यादी भेदाविषयी अभ्यास करणे. अशा दृष्टिकोनामुळे अभ्यासात बराच फरक पडतो. जॉन यांचे संशोधन एथ्नोग्राफिक आहे.

त्याचप्रमाणे सरधोपटपणे केलेल्या संशोधनामध्ये संबंधितांच्या मुलाखती, कागदपत्र–अहवाल व इतर मुद्रित साहित्यांचा अभ्यास, विषयासंबंधीच्या शिबिरांना, अधिवेशनांना हजेरी, ऑडिओ – व्हिडिओ वरून काढलेले मुद्दे इत्यादींवर भर असतो. परंतु हा संशोधक मळलेल्या वाटेने न जाता प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात जाऊन तेथील मुख्य संघटक व इतर कार्यकर्ते यांच्याशी गप्पा मारून व त्यांच्या कार्यात सहभागी होत निष्कर्ष काढत होता. चिकित्सकपणे त्यांच्या कार्याचा आढावा घेत त्यांचे प्लस व मायनस पॉइंट्स शोधण्यात त्याला रुची होती. एका प्रकारे त्या संघटनेचा तो 'सोशल ऑडिट' करत होता.

या पुस्तकाच्या दुसऱ्या भागात या देशात संघटितपणे केलेल्या रॅशनॅलिझमच्या प्रयत्नांचा आढावा घेतला आहे. चार्वाकापासून सुरुवात झालेली ही परंपरा, वैदिक इहवादात व त्यानंतर भक्ति पंथात स्पष्टपणे दिसून येते. मध्ययुगात प्रचलित असलेल्या अंधश्रद्धेवर संत कबीर व संत तुकाराम यांनी मोठ्या प्रमाणावर आघात केला आहे. परंतु पाश्चात्त्य तत्त्ववेत्त्यांना अभिप्रेत असलेले रॅशनॅलिझम ब्रिटिश कालखंडात मूळ धरू लागली. अनेक भारतीय इंग्रजी शिकू लागले. इंगरसॉल, ब्रॅडलॉ, बेझंट यांच्या वैचारिक लेखनाने प्रभावित झाले. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात आगरकर, फुले, पेरियारसारखे समाजसुधारक रॅशनॅलिझमवर आधारित चळवळी सुरू करण्याच्या प्रयत्नात होते. परंतु त्या मुळातच धार्मिक सुधारणेच्या चळवळी होत्या. जवाहरलाल नेहरू व मानवेंद्र नाथ रॉय यांनी खऱ्या अर्थाने रॅशनॅलिझमचा पाया घातला. गोरा यांनी १९४० साली नास्तिक केंद्राची स्थापना करून रॅशनॅलिझमच्या व्यावहारिक स्वरूपावर भर देण्याचा प्रयत्न केला. र. धों. कर्वे Reason या इंग्रजी नियतकालिकातून रॅशनॅलिझमच्या विविध पैलूंवर चर्चा घडवू लागले. या सर्वांच्या प्रयत्नाने प्रेरित होऊन २० व्या शतकाच्या पूर्वार्धात दिल्ली, हैदराबाद, नागपूर, मुंबई, विजयवाडा, भिलाई, रूरकेला, मद्रास, कोईमतूर, कन्याकुमारी, अमृतसर इत्यादी ठिकाणी रॅशनॅलिझमचा प्रचार व प्रसार करणाऱ्या संघटनांची स्थापना झाली. पाश्चात्त्य शिक्षणाने प्रभावित झालेले अनेक सुशिक्षित तरुण या कार्यात पुढाकार घेऊ लागले.

या संघटना प्रामुख्याने सत्य साईबाबासारख्या बाबा, बुवा, स्वयंघोषित गुरु, महाराज यांच्या विरोधात जनजागृती करण्याचे प्रयत्न करत होत्या. या संघटना चालवणारे फक्त पेपरमध्ये लेख लिहिणे व भाषण करणे येवढ्याच सीमित अर्थाने काम करत होते. त्या तुलनेने एच नरसिंहय्या व अब्राहम कोवूर यांचे कार्य मात्र सर्वस्वी वेगळे होते. अब्राहम कोवूर समाजाच्या तळागाळात जाऊन 'चमत्कारां'च्या प्रयोगांचे सादरीकरण करून त्यामागील विज्ञान समजून देत होते. मोठमोठ्या जनसमुदायासमोरील अशा प्रयोगामुळे लोक प्रभावित होत होते. अब्राहम कोवूर यांची ही गादी बी. प्रेमानंद यांनी चालवली. दक्षिण भारतातील ठिकठिकाणी जाऊन बाबाबुवांचे पर्दाफाश करत होते. तथाकथित चमत्कार करून दाखवत असल्यामुळे बाबा – बुवा अडचणीत येत होते. प्रयोगांना गर्दी होत होती. स्वातंत्र्योत्तर भारतातील तरुण पिढी चांगलीच प्रभावित झाली व रॅशनॅलिस्ट संघटना जोमाने कार्य करू लागल्या.

पुस्तकाचा तिसऱ्या भागात अंनिसची उद्दिष्टे, संघटनात्मक रूपरेषा, कार्यपद्धती, निर्णयप्रक्रिया, कार्यक्रमातील विविधता, व कार्याचा होत असलेला प्रभाव इत्यादींचा समावेश आहे. लेखकाच्या दृष्टीने ही एक एथ्नोग्राफिक स्टडी केस म्हणून व्यक्त होत आहे. भारतातील विवेकवादाच्या प्रगतीचा अभ्यास करण्यासाठी अंनिसचीच निवड का केली हे सांगताना अंनिसची चळवळ महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यात पसरलेली आहे. तिचे कार्यकर्ते सर्वात जास्त सक्रीय आहेत. ते सर्व विनावेतन कार्य करणारे स्वयंसेवक आहेत. आणि ते द्रविड कळघम या चळवळीसारखे राजकारणात बिलकुल रस घेत नाहीत.

प्रत्यक्ष चळवळीचे कार्य चालू असलेले क्षेत्र अभ्यासासाठी निश्चित करणे, त्या कार्यात शिरकाव करणं आणि त्या क्षेत्राशी निगडित राहणे, सुरुवातीस कठिण होते. परंतु नंतर अंनिसच्या कार्यकर्त्यांच्या मोकळेपणामुळे आणि मित्रत्वामुळे ते खूप सुकर झाले, असे लेखकाने मुद्दाम नमूद केले आहे. अंनिसने आखून घेतलेले अंधश्रद्धा निर्मूलनासाठी लढा, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार, धर्मचिकित्सा व व्यापक समाजसुधारणेत सक्रिय सहभाग या चतु:सूत्रीने लेखक प्रभावित झाला होता. व यांची अंमलबजावणी कशी होते याबद्दल उत्सुकता होती.

दूरदूरच्या खेड्यांत अंनिसचे कार्य कसे चालते? खेड्यातील सामान्य लोकांचा प्रतिसाद कसा असतो? खेड्यातल्यांच्यात भिनलेल्या अंधश्रद्धांच्या विरोधात बोलताना कार्यकर्ते कुठली रणनीती वापरत असतात? खेड्यातल्यांचा खरोखरच भ्रमनिरास होतो का? कार्यकर्त्यांच्या विधानांना, प्रयोगाच्या सादरीकरणाला प्रत्यक्ष विरोध होतो का? हुल्लडबाजी होते का? धर्मावरील टीका ते सहन करू शकतात का? इत्यादी अनेक प्रश्नांची उत्तरे त्याला हवी होती. त्यासाठी तो चळवळीच्या प्रत्यक्ष कार्यात सहभागी झाला. २-३ दिवस चालणाऱ्या बैठकींना हजर राहू लागला. प्रसंगी कार्यकर्त्यांच्या घरी राहायचा. अंनिसच्या विज्ञानबोधवाहिनीच्या गाडीतून प्रवासही करायचा. या सर्व प्रत्यक्ष अनुभवातून आणि डॉ. दाभोलकर व इतर अनुभवी कार्यकर्त्यांच्या मुलाखतीतून त्याच्या प्रश्नांना हळू हळू उत्तरे मिळत गेली. जरी ऐकून घेणारे एका दिवसात बदलत नसले तरी कार्यकर्त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल त्यांच्या मनात संशय नव्हता. कार्यकर्ते स्वतःच्या कुवतीनुसार उत्तर देत होते. समजून सांगत होते. देव – देवस्की, भूत – भानामती, अघोरी प्रथा यांच्या विरोधात भाष्य करण्यास कार्यकर्ते घाबरत नसत. या सर्व प्रकारामागे लोकांनी विचार करावे, प्रश्न विचारावेत, आर्थिक नुकसान करून घेऊ नये, आंधळेपणाने कृती करू नये, असे उद्देश असल्यामुळे लोकसुद्धा आवडो न आवडो, शांतपणे, सहनशीलपणे कार्यकर्त्याचे म्हणणे ऐकून घेत असत.

लेखकानी अंनिसच्या कार्यशैलीचा स्वतंत्रपणे अभ्यास करून या संघटनेचे वैशिष्ट्य व मर्यादा यांच्यावर टीकाटिप्पणी केली आहे. अंनिसच्या कार्यपद्धतीवर भाष्य करताना धर्माला विरोध करणे म्हणजेच विवेकवाद का हा प्रश्न त्याला पडतो. कारण अंनिसची याबद्दलची भूमिका धूसर आहे असे त्याला वाटते. खरे पाहता अंनिस उघड फसवणूक व शोषण करणाऱ्या धार्मिक विधींना व इतर गोष्टींना अंधश्रद्धेइतकेच विरोध करते व बुरसटलेल्या रूढी परंपरेसाठी वैज्ञानिक दृष्टिकोन हा एकमेव उपाय आहे यावर भर देते.

वैयक्तिक आयुष्यात रॅशनॅलिझम कशा प्रकारे आधार देतो याविषयीची भरपूर माहिती लेखकानी कार्यकर्त्यांच्या मुलाखतीतून गोळा केली आहे. विवाह, विवाह-सोहळा, कौटुंबिक संबंध, जन्म, मृत्यु, प्रेताची विल्हेवाट इत्यादिसंबंधीची कार्यकर्त्यांची मते तपासली आहेत. अंनिसच्या कार्यकर्त्याच्या मते अन्यायाविरुद्धचा लढा म्हणजे अविवेकीपणाच्या विरोधाचा लढा असतो. लेखकाला फुले यांच्या सत्यशोधकी पद्धतीचा निधर्मी विवाह सोहळा फार आवडलेला होता.

पुस्तकाचा शेवट करताना लेखक भारतातील रॅशनॅलिझमची चळवळ 'चमत्कार' व 'अतींद्रिय शक्ती'च्या समजुतीला कवटाळून बसलेल्या भारतीय समाजाला बाहेर काढणारी आहे, असे नमूद करू इच्छितो. रॅशनॅलिझमच्या चळवळीचा जोर जगभर पसरत असून भारतीय चळवळसुद्धा त्या जागतिक चळवळीचा भाग होण्याच्या प्रक्रियेत आहे, असे लेखकाला वाटते.

भारतातील रॅशनॅलिस्ट चळवळींचा सर्वंकष आढावा घेणारे इंग्रजीतील एक चांगले पुस्तक!

**Disenchanting India:**
Organised Rationalism and Criticism of Religion in India
*Johannes Quack*
Oxford University Press, 2012, pp 362, Price: Not Mentioned

pkn.ans@gmail.com

# जगावेगळे

*प्रभा गणोरकर*

चरित्र जीवनशैली

*(विदर्भातील तत्त्ववेत्ते व विचारवंत दि. य. देशपांडे ह्यांनी आपल्या विदुषी पत्नी मनू गंगाधर नातू ह्यांच्या प्रथम स्मृतिदिनी आजचा सुधारक ह्या विवेकवादी चिंतनाला वाहिलेल्या मासिकाची मुहूर्तमेढ रोवली त्याला आता पंचवीस वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्ताने ह्या जगावेगळ्या दांपत्यावरील, लोकमत २०१४ च्या दिवाळी अंकात पूर्वप्रकाशित झालेला हा लेख – का.सं.)*

गोष्ट खूप जुनी आहे. पन्नास पंचावन्न वर्षांपूर्वीची म्हणजे जवळजवळ गेल्या जन्माची वाटावी अशी. पण मला अद्यापही तो काळ विसरता येत नाही. लहानशा खेड्यातून मी विदर्भ महाविद्यालयात शिकायला आले होते. शहरात छोटीशी खोली घेऊन राहात होते आणि सायकलने कॉलेजात येत होते. एक दिवस त्यावेळच्या जोशी- मार्केटसमोरून जात असताना 'हिंदुस्थान' दैनिकाचे संपादक श्री. बाळासाहेब मराठे यांनी मला हाक मारून बोलावले. त्यांच्या वर्तमानपत्रात 'वाचक पाहिजे' अशी जाहिरात दिलेली होती ती त्यांनी मला दाखवली आणि कुठे जायचे तो पत्ता समजावून सांगितला. नातूबाईंनी ती जाहिरात दिली होती. त्यावेळी त्या आणि डी. वाय. देशपांडे कॉटन मार्केटकडे जाणाऱ्या आडव्या रस्त्यावर असणाऱ्या सरकारी बंगल्यात राहत होते. फाटकातून मी आत गेले. बंगल्याचे दार नानांनी उघडले, माझे नाव विचारले, मी कशासाठी आले आहे ते कळल्यावर ते मला आतल्या खोलीत घेऊन गेले. खोलीचे पडदे सरकवलेले असल्याने खोलीत काळोख होता, पंखा मंद फिरत होता, पलंगाजवळ असलेल्या लहान स्टुलावर डोके खाली केलेल्या टेबललॅम्पच्या उजेडात मी पलंगावर उश्यांना टेकून बसलेल्या बाईंना प्रथम पाहिले. शुभ्र साडी, शुभ्र पातळसर पोलके, कपाळावर अगदी बिंदुले काळे कुंकू, लख्ख गोरी कांती, काळेभोर केस मागे बांधलेले. त्यांनी मला जवळच्या खुर्चीवर बसायला सांगितले. माझी चौकशी केली आणि पुस्तक पुढ केले. त्यांचा तळवा मृदु आणि लालसर होता. हातात, गळ्यात एकही अलंकार नव्हता. चेहरा कमालीचा प्रसन्न, टवटवीत, हसरा होता. या होत्या नातूबाई.

माझे वाचन त्यांना आवडले. रोज कॉलेज संपल्यावर दुपारची मी त्यांच्याकडे वाचायला जाऊ लागले. सलग पाच वर्षे मी त्यांची वाचक होते. त्या काळात, मी पूर्वी कधीच वाचली नव्हती अशी अनेक पुस्तके वाचली. बहुतेक मराठी. अनेक कादंबऱ्या, कथा, वैचारिक गद्य. शिवाय ज्ञानेश्वरी आणि दासबोध. या वाचनाने मला अतिशय समृद्ध केलेच. पण त्याहीपेक्षा नातूबाई आणि नाना ही जणु दोन बृहद्ग्रंथच अशी व्यक्तिमत्त्वे माझ्या वाचनात आली. त्यांच्या जवळची, सहवासातली, नेहमी भेटणारी, क्वचित येऊन भेटणारी असंख्य माणसे, त्यांचे बोलणे, चालणे, एकूण मानवी वर्तन, मानवी स्वभाव, यातली कूटे, अतर्क्यता, परस्पर संबंधांची अगम्य वीण मी अगदी जवळून अनुभवली. ही पहिली पाच वर्षे आणि नंतर १९६८ ते ७५ अशी पुढची सात वर्षे अशी बारा वर्षे रोज नवे पान मी वाचले. आज या लेखाच्या निमित्ताने पुन्हा ती पृष्ठे नजरेपुढून सरकताहेत. कदाचित तेव्हा लक्षात आल्या नसतील अशा नवनव्या अर्थच्छटाही कळून येत आहेत.

बाईंकडे 'वाचक' म्हणून मी आले पण वाचनाव्यतिरिक्त आणि लेखनाव्यतिरिक्त त्यांची किरकोळ कामे त्यांनी मला कधी सांगितली नाहीत. मी सेकंड इयरला गेले तेव्हा त्यांचे शिकवणेही मी अनुभवले. त्या वर्षी टिळक-आगरकरांचे निबंध, नंतरच्या वर्षात आज्ञापत्र, ज्ञानेश्वरीचे चार अध्याय, भारती-साहित्यशास्त्र, विल्सनची फिलॉलॉजीची व्याख्याने हे मी त्यांच्याकडून शिकले. त्यांची जाहीर व्याख्याने ऐकण्याचा योग आला नाही पण त्यांच्या शिकवण्याचा ठसा अजून मनावर आहे. दुसऱ्यांकडून वाचून घेतलेले असूनही त्यांचे पाठांतर चांगले होते, अनेक संदर्भ त्या व्याख्यानात सहज गुंफून घेत. त्या शिकवत असताना वर्ग अगदी शांत, स्तब्ध असे आणि त्यांना ते तसेच हवे असे.

आमचे नाते हळूहळू बदलत गेले, गाढ आणि आत्मीय होत गेले. पण त्यांनी त्यातले खाजगीपणही सांभाळले. त्या माझी इतर चौकशी कधी करीत नसत. माझे आई-वडील, बहीण-भाऊ, माझी आर्थिक परिस्थिती, यांच्यांसंबंधी विचारणा त्या करीत नसत. स्वत:विषयी बोलणे मलाही आवडत नसे. ज्याअर्थी मी 'वाचक' म्हणून काम करते, खोली घेऊन राहते, सायकलने कॉलेजात जाते त्याअर्थी माझे गरजू

असणे स्पष्टच होते. पण त्यांनी आर्थिक मदतीची भाषा कधी केली नाही. वास्तविक बाई आणि नाना अतिशय उदार होते आणि अनेकांना त्यांची मदत केल्याची ख्यातीही मी ऐकली होती. पण माझ्या बाबतीत माझे स्वावलंबी असणेच योग्य आहे असेच त्यांना वाटत असावे. माझी सख्खी आत्या विदर्भ महाविद्यालयातच गणित शिकवणारे आणि त्याच परिसरात वसतिगृहाचे अधीक्षक म्हणून राहणारे प्राध्यापक क्षीरसागर यांची पत्नी होती. पण मी त्यांच्याकडे न राहता शहरात खोली भाड्याने घेऊन, स्वत: स्वयंपाक करून राहत असे. यातूनही माझे स्वतंत्र असणे त्यांना कळत असेल, त्याचे मनातून कौतुक असेल. बाईंचे माझ्यावर फार प्रेम होते. माझा बी.ए. चा मुख्य विषय संगीत हा होता. त्या मला नेहमी गाणे म्हणायला लावत, ज्ञानदेवांचे अभंग, जुनी भावगीते त्यांना आवडत. त्यांना झोप लागावी म्हणून मी गाणे सुरू करीत असे आणि नंतर हळूच त्यांच्या खोलीतून निघून हलक्या पावलांनी नानांच्या खोलीत जाऊन मी मानेने त्यांचा निरोप घेत असे.

बाईंच्या माझ्या इतर गप्पाही होत. त्या बोलत आणि मी ऐकत असे. बाईच्या जातीच्या सोसण्याबद्दल त्यांना कणव असे. आज विचार करताना वाटते, बाई कडव्या 'स्त्रीवादी' म्हणाव्या लागतील. बाईने स्वतंत्र असले पाहिजे, तिने पुरुषसापेक्ष असू नये असे त्यांना वाटत होते. स्वत: त्यांनी 'बाई'पणाशी निगडित सर्व गोष्टी बाजूला सारल्या होत्या, त्या काही त्यांना आजारपणामुळे शक्य नव्हत्या म्हणून नसाव्यात. त्या समर्थ असल्या तरी त्यांनी स्वयंपाकपाणी, पतिसेवा, अपत्यसंगोपन यांत आयुष्य घालवले नसते. स्वातंत्र्य हे मूल्य त्यांच्या दृष्टीने फार महत्त्वाचे होते आणि स्त्रीने त्याचा आग्रह धरला पाहिजे असे त्यांचे म्हणणे होते.

बाईंनी त्या काळात आपले माहेरचे नाव कायम ठेवले होते. विदर्भात तश्या आणखी एक म्हणजे गीता साने. बाईंची तशी काहीच माहिती मला ठाऊक नव्हती. पुढे 'श्रुतीं' मधून ती कळत गेली. बाईंचे मूळचे नाव मनकर्णिका. वडील व्हेटरनरी डॉक्टर होते. बाईंची आई त्या अगदी लहान असतानाच गेली. अक्का, ताई, माई आणि दोन भाऊ अशा भावंडांमध्ये बाई सर्वांत धाकट्या. आई वेगळ्या लहान मनूवर सर्वांनी प्रेमाचा वर्षाव केला. पुढे अक्कांचे, ताईंचे लग्न झाले, पण ताई वैधव्यानंतर सासरी स्वाभिमानाने जगता येईना म्हणून दोन लहान मुलांना घेऊन माहेरी आल्या. वडील आणि दोन भाऊ यांच्या मृत्यूचेही आघात झाले. तेव्हा बाईंना ताईंनी आपल्या तिसऱ्या अपत्याप्रमाणे सांभाळले. सर्वोदयी तपस्वी विनोबांचे सहकारी मामा क्षीरसागर, बाबा रेडीकर, दर्यापूरचे नाना गोखले, बापूसाहेब धर्माधिकारी या साऱ्यांनी बाईंचा प्रतिपाळ केला. बाईंना दु:खाचा वाराही लागू नये यासाठी ताईंनी कष्ट घेतले, बाईंची दृष्टी अधू होती, ताई त्यांना वाचून दाखवीत. या साऱ्यांचे श्रम आणि काळजी सार्थकी लागली, बाईंनी बी.ए., एम.ए. च्या परीक्षेत प्रथम आल्यानंतर त्या विदर्भ महाविद्यालयात रुजू झाल्या. स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची विदुषी म्हणून त्यांची ख्याती होऊ लागली. उत्कृष्ट वक्तृत्वानेही त्यांचे नाव गाजू लागले. स्त्रीस्वातंत्र्याची पुरस्कर्ती आणि धीटपणे तसे जगून दाखविणारी म्हणून त्या लहानशा गावात त्यांच्याविषी चर्चाही होत असत. डी.वाय.देशपांडे यांच्याशी त्यांनी विवाह केला त्यावेळी बाईंची तिशी उलटून गेली होती. डी.वाय. हे नागपूरच्या मॉरिस कॉलेजातून बदलून अमरावतीला आले होते, ते तत्त्वज्ञान आणि तर्कशास्त्र शिकवीत. त्यांची इंग्रजीत पुस्तकेही प्रकाशित झाली होती. डी.वाय. म्हणून ते ओळखले जात. जवळच्यांसाठी 'नाना'. त्यांचा 'एकांक' मला पुष्कळ उशिरा कळला. त्यांच्या दिवंगत पत्नीची बहीण लीलाताई यांची माझी योगायोगाने भेट झाली आणि बोलघेवड्या स्वभावाने मैत्रीही. त्यांच्या बोलण्यातून नाना मला अधिक ओळखीचे झाले. नाना फार सुस्वभावी, अंतर्मुख आणि 'रिझर्व्हड्' होते. त्यांना वाङ्मयाची आवड होती. ते टेनिस खेळत, त्याकाळचे जगमोहन, पंकज मलिक हे गायक त्यांना फार आवडत. उत्कृष्ट सिनेमे पाहणे, समविचारी स्नेह्यांशी गप्पागोष्टींत रमणे त्यांना प्रिय होते. नाना आणि बाई यांना परस्परांविषयी ओढ वाटून त्यांनी विवाहाचा निर्णय घेतला यात आश्चर्य नव्हते. बाईंचे हसरे, प्रसन्न, मोहक, आनंदी व्यक्तिमत्त्व, त्यांच्यातला गोडवा, एक प्रकारची निरागसता आणि मूलपणा, बुद्धिमत्ता, विनोदाची आवड हे सारे फार आकर्षक होते. दोघेही परस्परांना पूरक होते. विवाह करून ते विदर्भ महाविद्यालयाच्या परिसरातील बंगल्यात राहू लागले. मी त्यांना पाहिले तेव्हा बाईंच्या प्रकृतीच्या तक्रारी वाढल्या होत्या आणि त्यांचे इतरांहून वेगळे, असे सहजीवन सुरू झाले होते. पति-पत्नी नात्यातल्या पारंपारिक भूमिकांची दोघांनाही अपेक्षा नसणारे, विलक्षण कोटीतले हे नाते होते. स्त्रीपुरुषद्वंद्वातल्या सत्तासंबंधांचा मागमूसही नव्हता. अंथरुणाला जवळजवळ खिळल्याने नाना हे बाईंचे सर्वस्व असणे कळू शकते पण बाई हे नानांचे एकमेव निधान होते. त्यांच्यासाठीच त्यांचे अस्तित्व होते. वास्तविक तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात डी.वाय.देशपांडे या नावाला वजन होते, उत्कृष्ट प्राध्यापक अशी त्यांची ख्याती होती. १९५० पूर्वीच इंडियन फिलॉसॉफिकल असोसिएशनची स्थापना त्यांनी केली होती आणि त्या

संस्थेचे जर्नल ते चालवीत असत. त्यातून त्यांची टिपणे प्रकाशित होत. मे. पुं. रेगे, रा. भा. पाटणकर, अशोक केळकर, य.दि.फडके, ग.प्र.प्रधान यांसारखी दिग्गज विचारवंत माणसे नानांना मानीत असत. परंतु नानांनी बाईंसमोर त्यांचे 'करिअर' दुय्यम ठरवले. स्वत:चे लेखन, वाचन, व्याख्यानांची निमंत्रणे या सर्व गोष्टी त्यांच्या लेखी नंतरच्या होत्या, अहोरात्र बाईंसाठी असणे हे त्यांचे प्रथम प्राधान्य होते. त्यांच्या गरजेनुसार नानांनी स्वत:चे आयुष्य आणि स्वत:चा दिनक्रम ठरवलेला होता. हे सारे मी अनेक वर्षे, रोज पाहिले आहे आणि त्यामुळे चकितही झाले आहे. असे नाते मी त्यापूर्वी आणि त्यानंतरही पाहिले नाही. ते जगावेगळे होते.

बाईंसाठी जसे एक नाना होते तश्या ताईही होत्या. ताई म्हणजे कमलाताई वैद्य. ताई शहरात कॅम्पच्या रस्त्यावरच्या महाजनांच्या घरात राहात. बाईंनी आठवण काढली, त्यांचे दुखले खुपले की नाना कार घेऊन ताईंना आणायला जात. आमचे वाचन बाजूला ठेवून बाई अगदी अधीरपणे ताईंची वाट पाहात, गाणे गुणगुणत, दर सेकंदाला चाहूल घेत. त्या आल्या की बाई एकदम उल्हसित होत. नानाही निश्चिंत होत. बाईंचा गोतावळा मोठा होता. थोरल्या बहिणी, मेव्हणे, भाचे, भाच्या, बहिणींची नातवंडे, ओळखीपाळखीचे, स्नेही यांचे जाण-येणे असे. ताई साऱ्यांची काळजी- घेत. स्वयंपाकाकडे बघत. बाई, नाना आणि त्यांच्या पाठोपाठ सायकलने मी, कॉलेजातून आलो की चहा, ताजा, गरम बाईंच्या आवडीचा पदार्थ तयार असे. ताई उंचपुऱ्या, जाड काचांचा चष्मा, प्रकृतीने दणकट, नीटनेटक्या. त्यांची स्वच्छता, टापटीपही खास असे. बाईंचे त्या नानांसारखेच काळजीने सर्व करीत. त्यांचे केस विंचरून देत. हवे नको पाहात. येणाऱ्या जाणाऱ्यांच्या गप्पांमध्ये त्याही भाग घेत. कित्येकदा कही लोक गेल्यानंतर, बाई ताईंना त्यांची नक्कल करायला लावत आणि ताई त्या इतकी हुबेहूब, हातवारे, आवाज, लकबींसह करीत की आमची हसून पुरेवाट होई. त्यावेळी नाना त्यांच्या खोलीत काम करीत बसलेले असत. आमच्या हसण्या-खिदळ्याचा कसलाही विक्षेप न येता त्यांचा टाइपरायटर वाजत राही. ताईंच्या मुलीची मुलगी 'मृदुल' ही याला अपवाद होती. ती मुक्कामाला आली की नाना स्वत:चे काम बाजूला ठेवून तिचे लाड करीत. मृदुल हा त्या दोघांचा रम्य विसावा होता. नाना आणि बाई दोघेही मृदुलवर प्रेमाचा, वात्सल्याचा वर्षाव करीत. नानांचे अगदी वेगळे रूप त्यावेळी मी पाहात असे.

बाईंची राहणी साधीच होती. अलंकार पूर्णपणे आणि तत्त्वनिष्ठेने वर्ज्य. कित्येक वर्षे शुभ्र साडी आणि शुभ्र पोलके असा पोशाख असे. केसांची वेणी घालून चक्करडे मागे बांधलेले असे. त्या सँडलसारखे बंद पादत्राण वापरीत. सुरुवातीच्या काळात, एकदा त्यांचे पाय/लाल टाचा बघून मी त्यांना 'तुम्ही अळता लावता का पायांना' असे विचारले होते. तेव्हा त्यांना हसू आले होते. पुढे त्यांना स्पॉन्डिलिसिसचा त्रास होऊ लागला, हात मागे येईनात तेव्हा त्यांनी केस कापून मानेसरसे केले. गळ्याला कॉलर बांधू लागल्या. प्रकृतीच्या तक्रारींनी गांजल्याने त्यांना डिप्रेशन येऊ लागले तेव्हा डॉक्टरांनी त्यांना रंगीत साड्या नेसण्याचे सुचविले. त्या अगदी वेगळ्या दिसू लागल्या. पण त्यांनी स्वत:ची प्रसन्नता कधीही मालवू दिली नाही. त्या फार हळव्या होत्या. लहरीही त्यांची स्वत:ची काही मते अगदी टोकाची असत. स्त्रीपुरुष संबंधांची त्यांना आतून तीव्र नावड, जवळजवळ 'रिपल्शन' होते असा मला संशय आहे. 'पुरुष' या प्राण्याबद्दल त्यांचे मत चांगले नव्हते. नाना, मामा, बाबा हे अपवाद होते पण पुरुषाची बाईकडे पाहण्याची 'नजर' चांगली नसते आणि बाईने त्यांच्यापासून स्वत:ला दूरच ठेवले पाहिजे असे त्यांना वाटे. मी तेव्हा ते ऐकून घेत असे पण आता मला ते अगदी पटायला लागले आहे. बाई फार हळव्या, भावनाप्रधान होत्या. नानांच्या स्वभावाच्या जवळजवळ उलट टोकाचा स्वभाव. लोकांबद्दल त्या एकदम चांगले वाईट मत बनवीत आणि खाजगीत बोलूनही दाखवीत. त्यांच्या आवडीनिवडीदेखील टोकाच्या असत. त्या कधी कश्या 'रिॲक्ट' होतील, सांगता येत नसे. त्या चटकन दुखावल्या जात. लोकांच्या बोलण्याचा, कदाचित त्यांना अभिप्रेत नसलेला अर्थ त्या काढीत. त्यांचा मूड जाई. काहींच्या बाबतीत तर त्यांचा राग का आहे आणि तो कसा दूर करावा हे मला कळत नसे. त्यांच्या मनात निर्माण झालेला ग्रह दूर करणे अशक्यच असे. बाई अगदी कडवट होत. स्वत:ला त्रास करून घेत. ताई आणि नाना बाईंच्या कलाने घेत. तो विषयच बंद करून टाकत. बाईंना स्वत:चे रूप, कांती, स्वत:ची बुद्धिमत्ता याबद्दल एखाद्या सर्वसामान्य बाईसारखा अभिमान होता आणि दुसरी कोणीही स्त्री त्यांच्या तुलनेत डावी आहे हे ऐकायला त्यांना आवडत असे. त्यांच्यात असणाऱ्या अंतर्विरोधांचे मला कधी कधी आश्चर्य वाटे. नानांनाही ते कळत असणारच. कधी, काही ठिकाणी त्यांचा निरुपाय होई. कदाचित ते हताशही होत असतील पण त्यांच्याकडून बाईंचे काही कमी झाले नाही. त्यांचे बाईंवरचे प्रेम या साऱ्या गोष्टी बाजूला करून घेत असे. त्यांच्या अखंड, निरलस सेवाव्रतात एक क्षणभरही खंड पडला नाही. नानांच्या बाईंवरच्या प्रेमाचे कोडे मला कधी

उलगडले नाही. मला नानांबद्दल आदरयुक्त दरारा वाटत असे, अगदी भीतीच वाटत असे. त्यांच्याशी मी फारशी बोलतही नसे. नानांना बागकामाची आवड होती आणि फु ले तोडलेली आवडत नसे. मला हे एका प्रसंगाने कळले. त्यांनी अंगणात मोगरा लावला होता आणि आतल्या अंगणातही बरीच झाडे होती. एकदा मागच्या व्हरांड्यात एका कुंडीत गुलाबाचे सुंदर फूल उमललेले मला दिसले. ते मी तोडून घेतले. नानांच्या लक्षात आले नि ते गर्जना करीतच बाईंच्या खोलीत आले. तिथे मी स्टुलावर काचेच्या ग्लासात पाणी घालून ते ठेवलेले त्यांनी पाहिजे आणि क्षणार्धात निवळून तिथून निघून गेले. काही दिवसांनी दुसऱ्या कुंडीत फूल उमलले तेव्हा मी आणि नानांनी ती कुंडीच उचलून बाईंच्या खोलीतल्या कोपऱ्यात ठेवली, बाईंनी ते उमललेले सुंदर फूल पाहावे यासाठी.

बाई आणि नानांनी माझ्या बाबतीत दैवी क्षमाशीलता दाखवलेली मी अनुभवली आहे. एम.ए. होईपर्यंतची पाच वर्षे मी त्यांच्याकडे रोज वाचायला जात असे. एम.ए. झाल्यावर मी त्यांच्या मायेच्या सावलीपासून दूर गेले, जगण्याच्या स्थैर्याच्या विवंचनेत, उन्हात वणवणले, भरकटले, इतकी हरले, अपयशी ठरले, थकले की बाईंना तोंड दाखविण्याची मला हिंमत होईना. मी अगदी विपरीत जगत होते आणि बाईंना ते कुणाकुणाकडून नक्कीच कळत असणार. लोकांना बोलायचे असतेच. मी १९६८ च्या जून मध्ये दूर, भुसावळच्या कॉलेजमध्ये नोकरी घेतली. तिथे घरबीर शोधते न् शोधते तेवढ्यात मला बाईंची, म.गं.नातू अशी नेहमीची सही असणारे दोन ओळींचे कार्ड मिळाले. विदर्भ महाविद्यालयात प्राध्यापकाची जागा निघाली होती आणि बाईंना माझी आठवण होती. मी अमरावतीला येऊ न बाईंना भेटले. त्यांच्यापुढे सारे अपयश गळ्यात घेऊ न उभे राहणे हा माझ्या धैर्याच्या कसोटीचा क्षण होता. पण त्यांनी काही विचारले नाही. मी सांगितले ते ऐकून घेतले आणि मला बाहेर थांबायला सांगून त्यांनी नानांना बोलावले. त्यांचे मत विचारली आणि मला आत बोलावून प्राचार्यांकडे अर्ज करायला सांगितले. त्या दोघांनी सारे प्रवाह बाजूला सारून मला संधी दिली होती. १९६० साली दार उघडून एका पंधरा वर्षाच्या ज्या मुलीला त्यांनी घरात प्रवेश दिला होता तिच्यासाठी त्यांनी पुन्हा दार उघडले आणि आत घेतले. पुन्हा एकदा बाईंना वाचून दाखवणे, गप्पा मारणे, त्यांना गाणे गाऊ न दाखवणे असा कार्यक्रम पूर्ववत सुरू झाला. हळूहळू माझे कुटुंब तयार झाले. जबाबदाऱ्या वाढू लागल्या. बाईंचे नि माझे नाते विभागप्रमुख आणि सहकारी प्राध्यापक असे होत गेले, तसे गैरसमज निर्माण झाले, अंतराय वाढू लागला, आमचे बोलणे तुटले, दुरावा इतका वाढला की, त्या निवृत्त झाल्या तेव्हा त्यांचा निरोप घ्यायलाही मी गेले नाही. पण माझ्याच बाबतीत असे घडले होते असे नाही. बाईंच्या अगदी जवळची झालेली माणसे कायमची दुरावण्याची उदाहरणे मला ठाऊ क आहेत. हा दुर्दैवी प्रकार होता. बाईंनी केलेली माया मनातल्या एका कोपऱ्यात ठेवून मी त्यांचा मनोमन निरोप घेतला. मला तो घ्यावा लागला. निरोपाच्या दिवशी घरी त्यांनी माझी वाट पाहिली असेल पण मी नाही म्हणजे नाहीच जाणार असे स्वत:शी भांडण करून नाहीच गेले. पश्चात्तापाच्या माझ्या आयुष्यातल्या अनेक क्षणांपैकी हा एक जिव्हारी डसलेला आहे.

बाईंमध्ये खूपच क्षमता होती. चिकित्सक वृत्ती, बुद्धिमत्ता, आकलनशक्ती, संवदेनक्षमता आणि वाङ्मयाची उपजत उत्तम जाण हे त्यांचे विशेष त्यांच्या शिकवण्यातून जसे प्रकटत असत तसेच त्यांना लेखनातही ते दिसतात. पण वाचनलेखनासाठी दुसऱ्यांवर अवलंबून राहावे लागत असल्याने त्यांना मर्यादा पडत. एकेका विषयावर पुष्कळ काळ चिंतन करीत, नानांशी चर्चा करीत त्या लेखनाची बैठक जमवीत. आगरकरांचा बुद्धिवाद, व्यक्तिस्वातंत्र्याचा आग्रह आणि भक्कम, ठाम विवेकवादी मांडणी यांचा बाईंवर प्रभाव होता. 'नवभारत'मध्ये आगरकरांवर लेख लिहिला होता. १९६१ साली 'नवभारत' मध्ये दोन अंकात त्यांचा 'सुधारक चुकले काय' हा प्रदीर्घ लेख प्रकाशित झाला. महाराष्ट्रातील स्त्रीविषयकसुधारणा हा बाईंच्या जिव्हाळ्याचा विषय होता. त्या सुधारणांना विरोध करणाऱ्या प्रतिपक्षाचे खंडन या लेखात अगदी तर्कशुद्ध रीतीने केलेले आहे. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या समग्र साहित्याची 'सुधारणावादी' या दृष्टिकोनातून सांगोपांग चर्चा जशी त्यांनी केली, तशीच आपल्या सर्व कादंबऱ्यांतून स्त्रियांची पुरोगामी व्यक्तिमत्त्वे रंगवणाऱ्या वामन मल्हारांनी 'इंदू काळे' या कादंबरीत मात्र विचारांमध्ये माघार घेतली आहे. अशी चिकित्सा करणारा दीर्घ लेख लिहिला. त्यांचे सात दीर्घ लेख'विवेकाची गोठी' या संग्रहात एकत्रित केलेले आहेत. हा लेखसंग्रह त्यांनी 'ज्योतिबा आणि सावित्रीबाई या महामानवांस' अर्पण केला आहे. त्यांचा वामन मल्हारांवरचा लेख म्हणजे 'स्त्रीवादी' समीक्षेचे पहिले महत्त्वाचे उदाहरण आहे असे माझे मत आहे.

प्रतिकारशक्ती कमी झाल्याने त्या वारंवार आजारी पडत. सभोवतालचे वातावरण बदलत होते. नवी पिढी कॉलेजात दाखल होत होती, या ना त्या माणसांच्या व्यवहारात, वागण्या–बोलण्यात बाई अडकून पडत. मनाला लावून घेत, त्यातच व्यग्र राहात. शिवाय त्या ‘करिअरिस्ट’ मुळी नव्हत्याच. त्यांचे वाचनलेखन त्यांच्या स्वत:च्या आनंदासाठी होई. त्यांच्याकडे पीएच.डी. करणारे विद्यार्थीही होतेच. स्वत:ला समाधान वाटावे असे लेखन तब्येतीने करण्याचा त्यांचा स्वभाव होता. खानोलकरांच्या कथा आणि कादंबऱ्या मी त्यांच्याबरोबरच वाचू लागले होते. खानोलकरांच्या साहित्यातल्या स्त्रियांची चित्रणे फार अस्वस्थ करणारी असत आणि एकीकडे खानोलकरांवर टीकाही सुरू होती. मी एकदा काव्यस्पर्धेत बक्षीस मिळवले तेव्हा मी बाईंना विचारून खानोलकरांचा कवितासंग्रह कॉलेजकडून मिळवला होता. त्यांच्या बरोबरच्या या वाचनातूनच पुढे मी पीएच.डी. साठी खानोलकरांचे साहित्य निवडले. खानोलकरांच्या कादंबऱ्यांतील स्त्रियांच्या दु:खांची कारणे, त्यातले प्रत्येकीचे वेगळेपण शोधणारे खानोलकरांसंबंधीचे बाईंचे चिंतन हळूहळू आकार घेऊ लागले. त्यातून त्यांचे ‘वेदनेचा वेध’ हे पुस्तक निर्माण झाले. या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाच्या उत्कृष्ट ग्रंथाचा पुरस्कार मिळाला.

विदर्भ महाविद्यालयातून निवृत्त झाल्यानंतर नागपूरला स्थायिक होण्याचा निर्णय त्यांनी घेतला. अमरावतीला त्यांचे तसे काही खास वर्तुळ नव्हते. मुख्य म्हणजे ताईंचा मुलगा नागपूरला होता, त्याच्याकडे ताई राहात होत्या. त्यांचा मोठा आधार होता. नागपूरला गेल्यानंतर नानांच्या सहकार्याने बाईंनी आगरकरांच्या समग्र लेखनाच्या संपादनाचे जे काम केले ते बाईंच्या आयुष्याचेच जणु सार्थक होते. मला तो एक काव्यात्म न्याय वाटतो. बाई आगरकरांच्या अनुयायी होत्या. सुधारणावाद आणि विवेकवाद ही मूल्ये त्यांनी निष्ठेने अनुसरली होती. निवृत्तीनंतर प्रकृती आणि त्यांच्या लेखन वाचनाला नेहमीच पडलेल्या मर्यादा यावर मात करीत सुमारे १५०० पृष्ठांचा मजकूर बारकाईने वाचून आगरकरांच्या लेखनाचे तीन खंड त्यांनी तयार केले आणि त्याला प्रस्तावना लिहिल्या. पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेत आगरकरांचे चरित्र आणि कार्य यांची थोरवी व्यक्त झालेली आहे. पहिल्या व दुसऱ्या खंडात आगरकरांचे सुधारणाविषयक विचार मांडणारे निबंध संगृहित केलेले आहेत. तिसऱ्या खंडात आगरकरांचे इतर वाङ्मय समाविष्ट आहे त्याची ‘ग्रंथकार आगरकर’ ही प्रस्तावना महत्त्वाची आहे. आगरकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे, सुधारणाविषयक कार्याचे, विवेकवादावरील निष्ठेचे विश्लेषण करीत आगरकरांचे विचार कालबाह्य झालेले नाहीत, ते द्रष्टे होते, दूरदृष्टीने त्यांना महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारतीय समाजाच्या सुधारणेचा समग्र विचार केला होता त्याची आजही गरज आहे. यासाठी नाना आणि बाईंनी कळकळीने समाजहितासाठी हे काम हाती घेतले आणि पुरे केले. आगरकरांवर त्यांच्या काळात आणि पुढे किती अन्याय झाला या विचारांनी बाई व्यथित होत. त्यांचे काळीज तुटे आणि आगरकरांच्या विरोधकांवर कोरडे ओढीत. आगरकरांनी सुचवलेल्या सुधारणांचे आता प्रयोजन नाही. त्यांचे विषय जुने झाले आहेत. त्यांच्या सामाजिक तत्त्वज्ञानाचा पाया डळमळीत झाला आहे असे म्हणणाऱ्यांनी कोणत्याही लेखनाची मोल त्याच्या विषयात नसून त्यामागच्या विचारसरणीत असते याकडे तर लक्ष दिलेच नाही आणि त्याहून पलिकडचे तत्त्वज्ञानही मांडले नाही. धार्मिक पुनरुज्जीवनाकडे कड्यावरून कोसळणाऱ्या दगडाच्या गतीने समाज वाटचाल करीत आहे हे तथाकथित विचारवंत उघड्या डोळ्यांनी पाहात होते. पण ते अरिष्ट थांबवण्याचे प्रयत्नही केले नाहीत. फुले आणि आंबेडकर यांनी केलेल्या कार्याचे महत्त्व अधोरेखित करताना आगारकरांचे कार्य ब्राह्मणी आणि मर्यादित कक्षेतले मानून त्यांना अनुल्लेखनाने मारण्याचा प्रयत्न पुढच्या काळात हेतुत: केला गेला.

सर्वधर्मभावाची वरवर भाषा बोलणाऱ्या छुप्या जातीयवाद्यांचा नवा वर्ग हळूहळू वाळवीसारखा समाज पोखरून टाकीत राहिला आणि दुसरीकडे ‘धर्मा’चे पुरुज्जीवन करण्याचा कार्यक्रम जोमात सुरू राहिला. या सर्वांचे दुष्ट परिणाम आज धडधडीत दिसताहेत. संपूर्ण समाज भरकटलेलाआहे. विवेकाचा भर तर उरलेला नाहीच, वैचारिकतेचे अधिष्ठानही नष्ट झालेले आहे. अंधश्रद्धांची विद्रूप रूपे सर्वत्र दिसताहेत. मध्यमवर्ग बुवाबाजीच्या मागे डोळे मिटून धावतो आहे. अशावेळी कुठेतरी ‘आजचा सुधारक’ चा दिवा हाती घेऊन जाणारेही आहेत या गोष्टीने धीर येतो. नानांनी बाई गेल्यानंतर विवेकवादाला वाहिलेले ‘ आजचा सुधारक’ सुरू केले. त्यातून होणारे विचारमंथन आणि चर्चा प्रेरक ठरणाऱ्या आहेत. बाई आणि नानांची ही अपूर्व देणगी आहे.

बाई ‘आगरकरवादी’ होत्या एवढे म्हणणे पुरेसे नाही. त्यांच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वावर आगरकरांच्या विचारांचा, मूल्यांचा आणि शैलीचा प्रभाव होता. शिवाय त्यांच्या स्वत:च्या खडतर, आह्वान देणाऱ्या, जिद्दीने उभे राहायला लावणाऱ्या जगण्यातून आलेले काही खास

गुणधर्मही होते. संवेदनशीलतेबरोबर करुणा, ममता आणि क्षमाशीलता होती. कित्येकांवर त्यांनी अपत्यवत प्रेम केले. त्यांच्या आयुष्यांना आकार दिला, कित्येकदा आपले मन समजावून न घेता माणसे गैरसमज करून घेतात या अनुभवाने त्या उन्मळून जात. पण नानांमुळे त्या सावरू शकत. पुन्हा जीवनाकडे आशावादी दृष्टीने बघू शकत. बाईंच्या सहवासात मी काही अविस्मरणीय क्षण अनुभवले. बाहेर रणरण उन्ह असताना वाळ्याच्या ताट्या लावलेल्या त्यांच्या गार खोलीत मंद प्रकाशात मी त्यांच्याबरोबर पुस्तके वाचली, चर्चा केल्या. संध्याकाळी अंगणात पाणी शिंपडून खुर्च्या टाकल्या जात. तेव्हा मोगऱ्याचा आणि मातीचा गंध अनुभवीत जी.ए. कथांनी अधिकच हळवे होत. काही स्तब्ध होऊन बसून राहत असू. त्यांनी शिकवलेली ज्ञानेश्वरी तर विसरणे शक्यच नाही. पण बाई आणि नानांनी केलेल्या संस्कारांमधले मी काय सांभाळले या प्रश्नाने मी अस्वस्थही आहे. त्यांची पुन्हा एकदा आठवण काढीत मला त्यांच्याकडे एक कबुलीही द्यावीशी वाटते. मी विवेकवादी बनले नाही. धार्मिक विधींमध्ये सहभागी होते, उपवासादी आचार सुरूच असतात, ईश्वर मानते आणि या भवाच्या कटकटींनी थकल्यावर ईश्वराला शरण जाते. तत्वनिष्ठा दूरच कित्येकदा आत्मविसंगत वागते. फक्त एक समाधान आहे, हे माझे मला कळते, नाना-बाईंसारखे कोणीतरी मला समजूनही घेते, क्षमा करते. नाना बाईंसारखे दुसरे मात्र मला नंतर भेटले नाही. ही दोन पण परस्परांशी प्रेम आणि तत्त्वनिष्ठा या सूत्रांनी एकरूप झालेली, जगावेगळी माणसे, निरपेक्ष, भावनेने इतरांवर मायेचा, स्नेहाचा वर्षाव करणारी माणसे माझ्या आयुष्यात आली होती याची मी पुन्हा एकदा स्वत:ला आठवण करून देते आहे. जगण्याच्या या मुक्कामावर, स्वत:ला अशी आठवण देणे आवश्यकही आहे.

(हा लेख लिहिताना सुनीती देव, विवेक गोखले आणि श्रीधर वैद्य यांचे सहकार्य लाभले. त्यांचे मन:पूर्वक आभार मानते.)

-'लोकमत' २०१४ च्या दिवाळी अंकाच्या सौजन्याने

vasantprabha@yahoo.com

■■

नमस्कार,

'आजचा सुधारक' च्या संकेत स्थळावर आपले मनःपूर्वक स्वागत.

गूगल सर्च वर www.aajachasudharak.in कॉपी पेस्ट केल्यास संस्थळ उपलब्ध होईल.

हे संस्थळ लेखक व वाचकांच्यासाठी पुरोगामी विवेकवादी विचारांना उत्तेजन देणाऱ्या व्यासपीठाच्या स्वरूपात असेल. या विचारांचे लेख, चर्चा, प्रतिसाद यांचा समावेश यात असून त्यांचे येथे स्वागत होईल. **मुख्यपाना**बरोबर **मनोगत, लेखकसूची**, **विषयसूची**, **विशेषांक, ग्रंथसूची, मागील अंक** इत्यादी सदर या संस्थळावर आहेत.

छापिल मासिकाप्रमाणे दर महिन्याला नवीन लेखांची भर **नवीन लेख** या सदराखाली येत राहतील. लेखावरील प्रतिसादांचे स्वागत होईल. कृपया संपर्कात उल्लेख केलेल्या ई- पत्त्यावर आपल्या सूचना, प्रतिसाद पाठवावे व संस्थळाच्या उद्दिष्टाशी पूरक असे लेख पाठवावीत, ही विनंती.